|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ३० | सोमवार दि. १८ जुलै २०२२ ते रविवार दि. २४ जुलै २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## तिच्याकडून स्वयंपाकच नाही झाला चिडलेल्या सुनेने सासूचा खून केला

पुणे/क्राईम रिपोर्टर

समाजात सासू-सुने मधील वाद काही नवा नाही. कुठल्याना कुठल्या कारणावरून सासू-सुना भांडत असतात. मात्र पुणे जिल्ह्यातील चाकणमध्ये सासू-सुनेच्या भांडणात सुनेने एकदम टोकाचे पाऊल उचलले. सासूने स्वयंपाक केला नाही म्हणून आपली लहान मुलगी उपाशी राहिली. या गोष्टीचा सुनेला इतका राग आला कि तिने नायलॉनच्या दोरीने सासूचा गळा आवळून खून केला आणि सासू फीट येऊन पडली असे सांगू लागली. पण ... पान २ वर

## प्रशासनाच्या संगनमताने चाळमाफियांनी अनधिकृत बांधकाम केले कष्टाच्या कमाईने घर घेणारे गोरगरीब मात्र दरडीखाली चिरडून मेले





वसई/लक्ष्मणराव पाटोळे

पावसाळ्यात दरडी कोसळून अपघात घडतात याची प्रशासनाला माहिती असतानाही डोंगर उताराला होणाऱ्या बेकायदेशीर बांधकामांकडे पालिका, महसूल, वनविभाग आणि पोलीस यांचे हेतुपुरस्कर दुर्लक्ष झालेले असते. कारण अशा बेकायदेशीर बांधकामांना प्रशासनाचाच पाठिंबा असतो. कारण बेकायदेशीर बांधकामे करणारे भूमाफिया आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यातील आर्थिक देवाण घेवाणी मधूनच अशा धोकादायक जागी चाळी बांधल्या जातात आणि जागेच्या शोधात असलेले गोरगरीब आयुष्यभराची कष्टाची कमाई यात घालून या चाळींमध्ये चार-पाच लाखांत मिळणारे घर घेतात आणि या बेकायदा चाळींच्या बांधकामात पालिकेसह प्रशासनाच्या इतर विभागातील अधिकाऱ्यांचेही हात गुंतलेले असल्याने या चाळी बांधणाऱ्या भूमाफियांवर कारवाई होत नाही. त्यामुळे डोंगराच्या खाली झपाट्याने बेकायदेशीर चाळी उभ्या राहत आहेत आणि त्यासाठी डोंगर पोखरले जात आहेत. त्यामुळे डोंगरांच्या पायथ्याचा परिसर कमजोर होत आहे आणि मुसळधार पाऊस जेंव्हा पडतो, तेंव्हा डोंगरावरून येणारे पाणी माती आणि दगड खाली येतात. शिवाय खोदकामामुळे कमजोर झालेले डोंगर खचतात आणि दरडी कोसळून डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या चाळींवर पडतात आणि अशा दुर्घटनेत त्या चाळींमध्ये राहणाऱ्या गोरगरीब लोकांचा जीव जातो. एकीकडे सरकार पर्यावरण बचाव मोहीम राबवते, तर दुसरीकडे प्रशासनातील अधिकारी डोंगरांच्या बेकायदेशीर खोदकामांकडे आणि त्या खाली होणाऱ्या बांधकामांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भविष्यात भूसंखलन होऊन माळीन सारखी भयंकर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

नुकतीच वसईच्या पुर्वेकडील वाघराळ पाडा राहुलेश्वर मंदिराजवळ अशीच एक दुर्घटना घडली. चाळीवर दरड कोसळून एक पुरूष आणि त्याची १५ वर्षांची मुलीचा बळी गेला, तर आई आणि मुलगा गंभीर जखमी आहेत. या प्रकरणी पालिकेच्या तक्रारीवरून पोलिसांनी ज्या चार लोकांवर गुन्हा दाखल केला आहे, त्यातील एक महिला २००९ सालीच मरण पावली आहे. तिच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. या ठिकाणी शेकडो घरे आहेत आणि दारा व रंधा या दोन भूमाफियांनी हि जमीन हडप करून त्यावर या चाळी बांधलेल्या आहेत. मात्र या संपूर्ण प्रकरणाचे सूत्रधार असलेले आणि प्रशासनाला म्यॅनेज करणारे मनीष ठाकूर आणि ब्रिजेश यादव यांच्यावर मात्र गुन्हा दाखल झालेला नाही. तसेच या सर्व बांधकामांना पालिकेचे, महसुलचे, वनखात्याचे आणि स्थानिक पोलीस ...पान २ वर

### पालिका अधिकाऱ्यांनी एकही पैसा खाल्लेला नाही -अतिरिक्त आयुक्त

वसईतील दरड दुर्घटनेनंतर घटनास्थळाची पाहणी करायला गेलेल्या अतिरिक्त आयुक्त आशिष पाटील यांच्यावर पत्रकारांनी प्रश्नांचा भडीमार करताच त्यांनी या प्रकरणातून हात झटकताना आमच्या अधिकाऱ्यांनी एकही पैसा खाल्लेला नाही असा हास्यास्पद खुलास केला आहे. पालिका अधिकाऱ्यांनी पैसे खाल्ल्याशिवाय हि अनधिकृत बांधकामे उभी राहिलीत का? आणि पालिका अधिकाऱ्यांनी पैसे खाल्ले नसतील तर आशिष पाटील यांनी या अनधिकृत बांधकामांवर कारवाई का नाही केली? संपूर्ण डोंगर कोसळून आणखी काही माणसे मारायची वाट बघत होते का? कि भूमाफियांकडून येणाऱ्या मोठ्या गुडविलची वाट बघत होते, अशी प्रतिक्रिया वसईकर व्यक्त करीत आहेत.

## अब्रु वाचवताना लाख मोलाचा जीव गेला बापाने मुलीच्या प्रेतावरच बलात्कार केला



भिवंडी/क्राईम रिपोर्टर

वासनांध नराधम कधी कधी इतके हैवान होतात कि त्यांना रक्ताच्या नात्याचाही विसर पडतो. अशावेळी त्यांना फक्त एकच गोष्ट दिसत असते ती म्हणजे आपली विकृत तहान भागवणे. अशावेळी त्याला प्रत्येक स्त्री मध्ये एक बाई दिसत असते. मग ती आई असो बहिण असो कि मुलगी असो. हि सगळी नाती त्यांच्या समोर संपलेली असतात. त्याला फक्त इच्छापूर्तीसाठी एक स्त्री हवी असते. ती कुणाच्याही रुपात असो त्याला फरक पडत नाही. भिवंडीमध्ये अशाच एका वासनांध नराधमाने चक्क पोटच्या पोरीचे लैंगिक शोषण केले आणि एकेदिवशी तिला ठार मारून तिच्या मृतदेहावरही अत्याचार केले. माणुसकीला कलंकित करणाऱ्या या घटनेने संपूर्ण भिवंडी शहर हादरले असून या नराधमाला पोलिसांनी अटक केली आहे.

भिवंडीमध्ये नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. भिवंडीत जन्मदात्या बापानेच आपल्या १० वर्षाच्या मुलीची हत्या केली. मुलीच्या मृत्यूनंतर बापाने तिच्या मृतदेहावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे भिवंडीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी भिवंडी पोलिसांनी नराधम बापाविरोधात गुन्हा दाखल करत अवघ्या तीन तासांत त्याला बेड्या ठोकल्या आहेत. भिवंडी परिसरात आरोपी बाप त्याची पत्नी आणि १० वर्षाची मुलगी हे तिघे जण राहत होते. आरोपी आपल्या मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार करायचा. याला मुलगी विरोध करायची त्यामुळे त्यांच्यामध्ये सतत भांडण होत होते. अशामध्ये आरोपी दारुच्या नशेमध्ये घरी आला त्याने आपल्या मुलीवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दोघांमध्ये भांडण झाले. पोटच्या मुलीला आधी रागाच्या भरात बापाने मारहाण केली. त्यानंतर टॉवेलच्या साहाय्याने गळा आवळून तिची हत्या केली.... पान २ वर

## वादाचा शेवट जीवघेणा ठरला प्रियकराने प्रेयसीचा गळा चिरला

पुणे/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंध हे गरजेपुरते असतात. अशा संबंधात प्रेयसीने प्रियकराची शरीरसुखाची गरज भागवायची असते आणि त्या बदल्यात प्रियकराने तिची पैशाची गरज पूर्ण करायची असते. पण जेंव्हा पुरुषाचा त्या बाईमधला इन्ट्रेस संपतो तेंव्हा तो पैसे देणे बंद करतो आणि त्यातून त्यांच्यात दुरावा येतो, भांडणे सुरु होतात. पुण्यातील विवाहिता करुणा आणि राजूच्या बाबतीत असेच झाले. राजूने पैसे देणे बंद करताच त्यांच्यात भांडणे सुरु झाली आणि एकेदिवशी राजूने लॉजवरच करुणाची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

३०शीतील करूणा काटमोडे ही देखणी आणि सेक्सी होती.तिच्या लग्नाला सात वर्ष झाली होती. तिचा नवरा एका हॉटेलमध्ये काम करीत होता. त्यांना ५वर्षाचा एक मुलगा ही आहे. घरची परिस्थीती ही बेताची असल्याने तिच्या नवऱ्याकडून करूणाची गरज भागत नव्हती. ती एका कंपनीत कामाला जावू लागली होती. तेथे काम करणाऱ्या सचिन शिंदे याच्याशी तिची गेल्या ५ ते ६ महिन्यापूर्वी तिची ओळख झाली होती.तो ही तिची जवानी बघून लाळ टपकत होता.कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेवून कुस्करतो असे त्याला झाले होते.तो तिच्याशी लाडी गोडी लावीत बोलत असताना त्याने तिची पुर्ण माहिती घेतली होती. तशी ती त्याला चालू वाटत असल्याने तो तिच्याशी लगट करीत बोलत होता. ... पान २ वर

## तीन महिलांच्या हत्या करून दागिने लुटले खुनी मुकुंदाचे अखेर चपलेमुळे बिंग फुटले







जळगाव/क्राईम रिपोर्टर

वाघाच्या तोंडाला रक्त लागल्यावर जसा तो नरभक्षक बनतो. तशीच अवस्था गुन्हेगारी प्रवृत्तीच्या माणसाची असते. एकदाका त्याला एक गुन्हा पचला कि मग त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि तो एका पाठोपाठ एक गुन्हे करू लागतो. मात्र आरोपी किती जरी हुशार असला तरी गुन्ह्याच्या ठिकाणी त्याने काहीना काही पुरावा सोडलेला असतो. किनगावमध्ये राहणाऱ्या मुकुंद लोहार हा अट्टल जुगारी होता आणि जुगार खेळण्यास पैसे मिळावे म्हणून त्याने एका पाठोपाठ एक अशा दोन वृद्ध महिलांचे खून केले होते. पण त्या दोन्ही खुनाचा तपास न लागल्याने मुकुंदाने आणखी एका वृद्ध महिलेचा खून केला. मात्र यावेळी त्याची चप्पल घटनास्थळी राहिली आणि त्या चपलेनेच पोलिसांना मुकुंदाचा मार्ग दाखवला आणि पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या.

मुकुंदा ऊर्फ बाळू बाबुलाल लोहार यास अल्पवयातच झन्ना मन्ना जुगार खेळण्याचा नाद लागला होता. हाती आलेले पैसे तो चोपडा, शिरपुर परिसरात जावून जुगार खेळण्यात उडवून देत असे. जुगारात पैसे हरल्यानंतर पुन्हा कुठून तरी तात्काळ पैसे उपलब्ध करण्यासाठी तो प्रयत्न करत असे. यावल तालुक्यातील किनगाव येथील मुकुंदा लोहार यास जुगाराचा नाद स्वस्थ बसू देत नव्हता. वेल्डींगच्या दुकानावर तो काम करत असे. सन २०२१ मधे कोरोनाची लाट पसरली होती. प्रत्येकाला आर्थिक टंचाई आली होती. तशी मुकुंदा लोहार याला देखील आर्थिक चणचण भासत होती. त्याच कालावधीत त्याची नजर द्वारकाबाई चैत्राम सुरवाडे या ७० वर्ष ... पान २ वर

## सलमान-शाहरुखचे नाव वापरुन मालामाल झाला अफगाणी धर्मगुरुचा त्याच्या ड्रायव्हरनेच गेम केला

नाशिक (येवला)/क्राईम रिपोर्टर



मयत जरीफ

दुनिया झुकती है लेकीन झुकाने वाला चाहिये! बोलीवुडशी काहीही संबंध नसताना एका अफगाणी धर्मगुरूने शाहरुख, सलमान आणि अमीर खांचे नाव वापरून भरपूर माया गोळा केली. मात्र हीच माया त्याच्यासाठी मृत्यूचे कारण बनली. कारण त्याच्या संपत्तीचा मोह त्याच्या जवळच्या लोकांना झाला आणि याच संपत्तीच्या मोहातून त्यांनी अफगाणी धर्मगुरूचा खून केला.

सुफी ख्वाजा सैय्यद जरीफ चिश्ती या अफगाणी धर्मगुरुच्या हत्येचा तपास लागला असून चौघा मारेकऱ्यांना अटक करण्यात आली आहे. सेवेकऱ्याच्या नावावर घेतलेली जमीन व कार बळकावण्यासाठी चालकासह त्याच्या साथीदारांनी अफगाणी धर्मगुरुची हत्या केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या हत्येप्रकरणी येवला शहर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. येवला शहर पोलीस स्टेशन हद्दीतील चिंचोडी एमआयडीसी शिवारात ५ जुलै २०२२ रोजी अफगाणी धर्मगुरु सुफी ख्वाजा सैय्यद जरीफ चिश्ती (२८) यांची हत्या करण्यात आली होती. मुळ अफगाण येथील रहिवासी असलेले धर्मगुरु मिरगाव आदित्य हॉटेलच्या मागे वावी ता. सिन्नर येथे रहात होते. गोळीबारीत त्यांची हत्या झाली होती. त्यांचा सेवेकरी अहमद खान याच्या दिशेने गोळीबार करुन त्याला जीवे ठार करण्याचा प्रयत्न झाला होता. या घटनेनंतर ... पान २ वर

## दारूच्या पार्टीतच आयुष्याचा खेळ सरला वाढदिवस त्याच्यासाठी काळा दिवस ठरला



मयत मुख्तार

मडगाव/क्राईम रिपोर्टर

आजकाल दोस्ती यारी फार काळ टिकत नाही. कारण मित्र प्रामाणिक नसतात. एका बाजूने मैत्रीचे नाटक करतात, तर दुसऱ्या बाजूने मित्राला कसे खड्ड्यात घालता येईल याचे आडाखे बांधत असतात. काही मित्र तर मित्राच्या घरी जाऊन त्याच्या बायकोवर किंवा बहिणीवर वाईट नजर ठेवतात. मडगाव मधील मुख्तार आणि सुरेश यांची मैत्री होती. पण सुरेशची त्याच्या बहिणीवर वाईट नजर होती. हे मुख्तारला समजताच त्याने सुरेश बरोबरचे संबंध तोडून टाकले. याचा सुरेशला इतका राग आला कि त्याने मुख्तारच्या वाढदिवसाच्या पार्टीत जाऊन त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सुरेश आणि त्याच्या साथीदारांना अटक केली आहे.



मडगाव शहरातील आझाद नगर येथील पहिल्या गल्लीत मुख्तार बदनी हा आपल्या आई वडिल दोन बहिणीसह राहयला आहे. तो एका कापड दुकानात सेल्समन म्हणून काम करीत असताना त्याची ओळख ही सुरेश जालगर याच्या बरोबर झाली. तो ही कापड विक्रेता म्हणून काम करीत होता. त्या दोघांची ओळख झाल्यावर त्याचे एकमेकांच्या घरी येणे जाणे वाढले होते...पान ६ वर

## आत्महत्या करणाऱ्या मुलाला आईने तारले अखेर त्याच जन्मदातीला मुलाने ठार मारले

मुंबई/एस.कुमार



वपोनि कोथिंबीरे

'ठेच लागता माझी पायी, वेदना होती तिच्या हदयी, तेतीस कोटी देवांमध्ये श्रेष्ठ मला माझी आई' असे आपण आईची महती गाताना म्हणतो. आईला मुले ही सर्व सारखीच असतात. मुलासाठी तिची काही करायची तयारी असत. नऊ महिने नऊ दिवस पोटात गोळा करून, त्याला जन्म देऊन, त्याचे संगोपन करून आई मुलाला लहानाचे मोठे करीत असते. मुलाला जन्म देऊन तिची जबाबदारी संपत नाही तर त्याचे लग्न होऊन नातू-नातवंड पाहण्याची तिची इच्छा असते. आईचे उपकार अनंत आहे ते कधी फिटणार नाही. या बदल्यात आईला मुलाने काय दिले. याचा विचार होणे गरजेचे आहे. हजारातील एखादाच श्रवण बाळ जन्म घेतो. पण हल्ली श्रावण बाळाचा काळ संपला आहे. या कलियुगात क्षुलक कारणावरून आईवडिलांशी भांडण करून त्यांचे मुडदे पाडले जात आहे तेही पोटच्या गोळ्याकडून. असाच काहीसा प्रकार मुलुंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. मालमत्तेच्या वादातून आईची हत्या करून मुलाने स्वतः रेल्वे खाली जीव देण्याचा प्रयत्न केला आहे.

दि. ९ जुलै २०२२ चा तो दिवस होता. सायंकाळी ६:३२ची वेळ होती. याच सुमारास पोलीस मुख्य नियंत्रण ... पान ६ वर

## पैशाच्या वादातून त्याने पत्नीला फटकावले चिडलेल्या पत्नीने त्याला फासावर लटकवले



मयत सिताराम

सिन्नर/क्राईम रिपोर्टर

पैशाचा वाद माणसाला नातीगोती विसरायला लावतो आणि त्यातून माणूस इतका हैवान बनतो कि आपल्याच कुटुंबातील एखाद्याचा खून करून नात्याला डाग लावायला मागेपुढे पाहत नाही. सिन्नर तालुक्यातील मुसळगाव येथे अशाच एका घटनेत बहिणीला देण्यासाठी पतीने पत्नीकडे पैसे मागितले म्हणून पत्नी इतकी चिडली कि तिने पतीला ठार मारून फासावर लटकावले आणि आत्महत्येचा बनाव केला. पण पोलिसांनी तिचा हा बनाव हाणून पडला आणि तिला अटक केली.



आरोपी वनिता

सिन्नर तालुक्यातील मुसळगाव येथे ४२ वर्षीय सिताराम लक्ष्मण गायकर हा आपली पत्नी वनिता समवेत रहात होता. मुसळगाव हायस्कूलमध्ये तो वॉचमनचे तर त्याची पत्नी अनिता ही शाळेतील मुलांसाठी खिचडी शिजवण्याचे काम करत होती. हे दाम्पत्य मुळचे नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील होते. कामधंद्याच्या निमित्ताने ते मुसळगाव येथे राहण्यास आले होते. गायकर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती तशी जेमतेमच होती. तरीही दोघे नवरा बायको आपापल्या कुवतीप्रमाणे कामे करून संसाराचा गाडा ओढत होते. गुरुवार दि. १९ मे २०२२ ची संध्याकाळ, साडेसात वाजले होते. वनिता काही कामानिमित्त घराबाहेर गेली आणि थोड्याच वेळात परत आली. तेंव्हा तिला तिच्या घरामध्ये भयानक दृष्य दिसले. तिच्या नवऱ्याने घरामधील छताच्या लोखंडी अँगलला असलेल्या पंख्याला फेटा बांधून गळफास घेतला होता. आपल्या नवऱ्याने गळफास घेतल्याचे पाहून वनिता घाबरुन गेली. आत्ताच आपण बाहेर गेलो होतो. तितक्यात पतीने आत्महत्या ... पान ६ वर

18 TO 24 JULY 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 16/07/2022 9:53 PM Page 1



पान १ वरून....

## प्रशासनाच्या संगनमताने चाळमाफियांनी...

प्रशासनाचे जे तत्कालीन आणि आताचे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावरही गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक करा अशी मागणी या भागातील जनतेने केली आहे. वसई पूर्वेच्या राजिवली येथील वाघराळ पाडा सर्व्हे नंबर १४६ हिस्सा नंबर १ येथे १३/७/२०२२ रोजी सकाळी ६.३०च्या सुमारास चाळीवर दरड कोसळून वंदना सिंग (४३) आणि तिचा मुलगा ओम सिंग (९) हे थोडक्यात बचावले पण अमित सिंग (३५) आणि रोशनी सिंग (१५) यांचा मात्र दुर्दैवाने मृत्यू झाला. या घटनेनंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तसेच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन बचाव कार्य सुरु केले. तसेच पालिकेच्या तक्रारीवरून चार जणांच्या विरोधात एमआरटीपीअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर एकाला अटक करण्यात आली आहे. या पावणेचार गुंठा असलेली हि जागा सामायिक मालकीची आहे आणि सातबारा वर ७० जणांची नावे आहेत. सध्या या जागेच्या सर्व मालकांमध्ये मालकी हक्काबाबत वाद सुरु असून प्रकरण २०१२पासून न्यायप्रविष्ठ आहे. मात्र इको झोन असलेल्या या जागेवर दारा व रंधा या दोन भूमाफियांनी कब्जा करून मे. मितवा रियालिटीतर्फे अजित रायसाहब सिंग उर्फ मिंटू सिंग यांनी या जागेचा विकास करण्यासाठी या ठिकाणचा डोंगर पोखरला आणि आणखी जागा वाढवली आणि त्यावर चाळी बांधल्या. सध्या येथे शेकडो घरे आहेत. ज्यांनी चार-पाच लाखात हि घरे घेतली, त्यांना सध्या नोटरीमार्फत खरेदी करार पत्र दिलीत. मात्र त्याचे रजिस्ट्रेशन करताना या जागेचा इतिहास त्यावर असलेल्या केसेस तसेच पर्यावरण आदी कशाचाही विचार न करता या बेकायदा चाळींना घरपट्टी लावण्यात आली. तसेच महावितरण विभागाने त्यांना विद्युत जोडणी दिली आणि हे सगळ पालिका, महसूल, वनविभाग आणि पोलीस यांच्या संगनमताने म्हणजेच आर्थिक सॅटेलमेंटने झाले आहे. २०१४ पासून या ठिकाणी या अनधिकृत चाळी बांधल्या जात होत्या आणि प्रशासनाने भूमाफियांकडून पैसे खाऊन या अनधिकृत बांधकामांची पाठराखण केली होती. त्यामुळे २०१४ पासून हा भाग ज्या पालिका अधिकाऱ्यांच्या आणि अभियंत्यांच्या अखत्यारीत येत होता त्यामध्ये गिल्सन गोन्सालवीस, राजेंद्र कदम, सुभाष जाधव हे सहाय्यक पालिका आयुक्त या कालावधीत होते, तर कौस्तुभ तामोरे, इंद्रजीत पाटील आणि विजय नडगे हे कनिष्ठ अभियंता होते. मात्र हे सर्वजण तिथे वसुली एजंट म्हणून काम करीत होते. त्या ठिकाणी डोंगर पोखरले जात आहेत. बेकायदेशीर चाळी बांधल्या जात आहेत याच्याशी त्यांना काहीच घेणे देणे नव्हते. कारण त्यांना या बांधकामांमध्ये प्रत्येक चौरस फुटामध्ये पैसे मिळत होते. तर प्रत्येक घरामागे १५ ते २० हजारांवर उकळले जात होते. तसेच न्याय प्रविष्ठ असलेल्या या जागेवर बेकायदा बांधकामे करणे हा न्यायालयाचा अपमान आहे. त्यामुळे या सर्वांवर प्रथम कंटेम ऑफ कोर्टचा गुन्हा दाखल व्हायला हवा. त्यानंतर डोंगर पोखारल्याबद्दल आणि युको झोनमध्ये चाळी बांधल्याबद्दल पर्यावरणाच्या हानीचा गुन्हा या अधिकाऱ्यांवर दाखल व्हायला हवा आणि हे सर्व ठाऊक असतानाही कारवाई केली नाही म्हणून आताच्या पालिका आणि महसूल अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हायला हवा. वसई दुर्घटना ही नैसर्गिक नसतानाही पालिका सहाय्यक आयुक्त निलम निजाई यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी एफआयआरमध्ये एमारटीपीची ५२,५३,५४ हि कलमे लावली आहेत. मग अगोदरच या कलमाच्या अन्वये कारवाई का केली नाही. या दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू झालाय आणि पोलिसांनी एफआयआरमध्ये चलाखी करून केवळ ३०४ हे कलम लावले आहे. पण त्यापुढे अ किंवा ब चा उल्लेख नाही याचा अर्थ आरोपींच्या बरोबर सेटिंग झाली कि त्यानुसार अ किंवा ब लावले जाणार का? या संपूर्ण प्रकरणाचा विचार करता प्रशासनातील अधिकारी आणि अभियंते कशा प्रकारे सर्व कायदे धाब्यावर बसवून आपली तुंबडी भरतात आणि गोरगरीबांना मृत्युच्या दाढेत ढकलतात हेच दिसून येते. त्यामुळे वसई दुर्घटनेत १३ वर्षापूर्वी मेलेल्या बाईवर गुन्हा दाखल करण्यापेक्षा या बेकायदेशीर बांधकामाला अभय देणाऱ्या पालिका अधिकारी, महसूल अधिकारी, वनविभाग आणि पोलीस अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल व्हायला हवा.

## तिच्याकडून स्वयंपाकच नाही...

शवविच्छेदनात सुनेचे पितळ उघड पडले आणि खुनाला वाचा फुटताच पोलिसांनी सुनेला अटक केली. पुण्यात गुन्ह्यांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना आता आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इथे सासूने आपल्या मुलीला जेवायला दिलं नाही म्हऊन सुनेने सासूचा खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे संपूर्ण परिसरातून खळबळ उडाली असून पोलीस या प्रकरणाचा तपास करत असल्याची माहिती आहे. सून बाहेर गेली असता सासूने घरी स्वयंपाकच केला नाही. त्यामुळे मुलीला जेवण मिळालं नाही आणि ती उपाशी राहिली. यावरून दोघींमध्ये वाद झाली आणि यातूनच गुन्ह्याचा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुषमा अशोक मुळे राहणार चाकण असं हत्या झालेल्या सासूचं नाव आहे तर सुवर्णा सागर मुळे (वय ३२) असं आरोपी सुनेचे नाव आहे. गुरूवारी रात्रीच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच चाकण पोलिसांनी आरोपी सुनेला ताब्यात घेतलं आबे. दोघींमध्ये सतत वाद सुरू असायचे. अशात मुलीला जेवण न देण्यावरून सुरू झालेला वाद विकोपाला गेला आणि सुनेनं नायलॉनच्या दोरीने सासूचा गळा आवळला. यामध्ये सासू सुषमा या बेशुद्ध झाल्या. पण यानंतर आरोपी सुनेनं असं काही केलं पोलिसांनाही धक्का बसला. सासू बेशुद्ध अवस्थेत पडली असताना तिला तसंच पडून दिलं. काही वेळाने मुलगा घरी आल्यानंतर सासूला फीट येऊन पडल्या असं तिने सांगितलं. मुलाने तातडीने रुग्णलयात नेलं असता तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. यानंतर डॉक्टरांना आलेल्या शंकेमुळे त्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दोघांचीही कसून चौकशी केली असता सूनेने गुन्ह्याची कबुली दिली. दरम्यान, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

## अब्रु वाचवताना लाख मोलाचा ...

ऐवढ्यावरच न थांबता आरोपीने मुलीच्या मृत्यूनंतर तिच्या मृतदेहावर बलात्कार केला. मुलीच्या हत्येनंतर आरोपी घटनास्थळावरुन फरार झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मुलीचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. तर शवविच्छेदन अहवालात मुलीच्या मृतदेहावर मृत्यूनंतर बलात्कार करण्यात आला असून गळा दाबून तिची हत्या करण्यात आली असल्याचे समोर आले. याप्रकरणी पोलिसांनी मुलीच्या बापाविरोधात पोक्सोसह अत्याचार आणि हत्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तपासाची चक्र फिरवून अवघ्या तीन तासांच आरोपीला अटक केली. आरोपीला कोर्टात हजर केले असता ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. मृत मुलीच्या आईने नराधम बापाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली आहे. या घटनेमुळे भिवंडी शहरामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

## वादाचा शेवट जीवघेणा ठरला...

तिने ही त्याच्या मनातील ओळखले असल्याने ती ही त्याला लाईन देवू लागली. बघता बघता त्या दोघांचे संबंध जुळाले होते. त्याने तिला सहज एकदा बाहेर येणार का म्हणून विचारले. त्यावर ती त्याला उगीचच काय काम आहे आणि कशासाठी म्हणून विचारले. त्यावर त्याने तिला स्पष्ट म्हटले मला तू खूप आवडते. जरा बाहेर जावून तुझ्याशी गप्पा गोष्टी करायच्या आहेत. त्याच्या मनात आपल्याबद्दल काय आहे हे तिने ओळखल्यावर तिने ही त्याच्याकडे थोडीफार पैशाची मागणी केली. त्याने ती मागणी लगेच पुर्ण करीत तिला आपलेसे केले. त्यानंतर तो तिला घेऊन एका लॉजवर गेला. त्याने तिला येथे का आणले आहे हे ती न ओळखण्या इतपत शहाणी होती. दोघे ही एकमेकांच्या मिठीत विसावत असताना त्याने तिच्या साडीची पीन खोलत बाजुला केली. तिच्या तोंडात तोंड घालत रसपान करीत तिच्या गोऱ्यापान मांडीवरून हात फिरवत तिच्यावर स्वार होत त्याने रोमान्स करीत तिला घाम फोडला. तिला ही तेच पाहिजे असल्याने ती ही त्याला भरभरून साथ देत होती. दोघांचा ही तो कार्यक्रम रंगात आला होता. आपल्या दमदार आणि रांगडया चालीने त्याने तिला घाम फोडला. या खेळात ती माहीर असल्याने त्याने ओळखले. म्हणून तो ही तिला पाहिजे तसे खेळवू लागला. आजपर्यंत तिला तिच्या नवऱ्याकडून जे मिळाले नाही ते सुख ती त्यचोकडून भरभरून घेत होती.तिला ही त्याचा ठोका आवडला असल्याने ती ही त्याला पाहिजे तसे आपल्या अंगावर ओढून घेत होती. पहिल्याच भेटीत तिने त्याला स्वर्ग सुख दिल्यावर तो ही खुश झाला होता. त्यानंतर त्याने तिला परत परत त्या कामासाठी लॉजवर नेले होते. दोन चार वेळा त्याने बोलविल्यावर ती गेली होती. आता त्या दोघांचे संबंध वाढीस लागले होते. ती त्याचेकडे आपली गरज सांगून पैसे मागत होती. ती आपली रखेलच बनली आहे असे समजून तो ही तिची प्रत्येक गरज पुर्ण करीत होता. एकंदरीत का तो तिच्या इतक्या आहारी गेला होता की त्याला तिच्या शिवाय चैन पडत नव्हती. तो ही गरज भागविण्यासाठी त्या कामासाठी तिला बाहेर बोलावून नेत मजा मारत होता. ती मात्र त्याचेकडे पैशाची मागणी करत त्याचेकडून पैसे उकळीत होता. त्याच्या ही गोष्ट अलिकडे लक्षात येत होती म्हणून तो तिने पैसे मागितले की तिला देत नव्हता. त्याची गरज आपल्या कडून भागली गेली आहे म्हणून तो आपल्याला पैसे दयायला नाही म्हणतो आहे हे तिने ओळखले होते. म्हणून ती तो बोलविला की त्याला नाही म्हणून सरळ सांगत होती. तू माझी गरज पुर्ण करीत नाहीस तर मी का तुझी गरज पुर्ण करू तुझ्यासारखे माझ्याकडे बरेच जण येतील. त्याचेकडून मी माझी गरज भागवून घेईन असे तिने भांडणात त्याला सुनावल्यावर त्याने काय ओळखायचे ते ओळखले होते. करूणा शिवाय त्याला जमत नव्हते. तिने ही त्याला आपल्या राणीची अशी काही झलक दाखविली होती की तो तिला सोडू शकत नाही हे तिने ही ओळखले होते. पण तो अलिकडे तिला पैसे देण्यास टाळाटाळ करू लागल्याने ती त्याला नाही म्हणत होती. या कारणातून तो तिच्यावर संशय घेवू लागला होता. ती आपल्याला सोडून दुसऱ्या कुठल्या तरी तरूणाच्या प्रेमात पडली असावी अशी शंका त्याला येत होती. कारण अशा लफडयातील बायकांचा काही अंदाच नसतो त्या आपली गरज पुर्ण करण्यासाठी एकाला सोडून दुसऱ्याला धरतात हे त्याला ही माहित होते. म्हणून ती भेटायला आली नाही की फोन वरून तिला तुझे आता दुसऱ्याबरोबर संबंध आहेत तुझा यजमान कोण आहे मला माहित आहे असे म्हणून भांडण उकरून काढीत होता. तो काही म्हणाला तरी तो आपलाच आहे हे तिला माहित होते पण ती त्याला त्या खेळात खेळवू इच्छित होती. त्याला चांगला वठणीवर आणू इच्छित होती. त्याने किती ही काही बोलले तरी ती मनावर घेत नव्हती. कारण तिला ही तो पाहिजे होता. यजमान करायचा तर तो एकच करायचा हे तिने ठरविले होते. म्हणून ती त्याचेबरोबर संबंध ही तोडू इच्छित नव्हती.तिला फक्त त्याचेकडून पैशाची गरज भागवायची होती. ती आता आपल्याकडे येत नाही हे बघून सचिन शिंदे कासावीस होत होता. रविवार दि.१० जुलै २०२२ रोजी त्याने तिला मला तुला भेटायचे आहे म्हणून फोन केला. त्यावेळी ही तिने त्याच्याकडे पैशाची मागणी केली. तुझा यजमान आहे ना त्याचेकडून पैसे घे असे तो तिला म्हणाला. त्यावेळी ती त्याला म्हणाली तुच माझा यजमान आणि नवरा ही आहेस मला तुझ्याकडूनच ते सुख आणि पैसे ही पाहिजे आहे. कुठे भेटायला येवू सांग असे ती त्याला म्हणाली, त्यावर त्याने शितल हॉटेलला जातो तेथे जावू असे म्हणत काही रक्कम तिला देण्याचे मान्य केले. त्याने पैसे देण्याचे मान्य केल्याने ती त्याला भेटायला तयार झाली. ते दोघे ही रविवारी रात्री शितल हॉटेलमध्ये मजा मारण्यासाठी गेले.नेहमी प्रमाणे ते रुमवर गेल्यावर त्या दोघात सुरूवातील कुरूबुर झाली. पण त्याने तिची समजूत काढून कामाला सुरूवात केली. दोघे ही नग्नावस्थेत बेडवर ते सुख घेत असताना सचिनने तिला तु मला का दमवतेस? म्हणत विषयाला हात घातला. तु माझी गरज पुर्ण कर. मी तुझी गरज पुर्ण करते असे ती म्हणाली. तो तिच्या नागडया अंगावर पडून ते सुख घेत होता. त्यातच त्याने तिला म्हटले तुझे माझ्या शिवाय आणि दुसऱ्याबरोबर संबंध आहेत ना मग घे ना त्याचेकडून पैसे ते तुला पाहिजे तेवढे पैसे देतात ना मग मीच कशाला पाहिजे म्हणत तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता.काम झाल्यावर त्या दोघात भांडण वाढले होते.त्या भांडणात ती त्याला काय वाटेल ते बोलत होती. तुला फक्त माझे शरीर पाहिजे तुला पैसे दयाला नकोत. मी काय तुझ्याबरोबर फुकट झोपायला तुझी बायको नाही, मी तुला माझे सगळे दिले उलट तु माझ्यावर संशय घेतोस म्हणत ती त्याचेबरोबर भांडत होती. त्याला ही तिचा राग येत होता. तुझ्यासारख्या बायकावर कितपत विश्वास ठेवायचा म्हणत तो तिला मारायला जात असताना तु जर मला मारायला आलास तर मी आराडा ओरडा करेन अशी धमकी तिने दिली. त्याला तिचा भयंकर राग येत होता. रागाच्या भरात त्याने आपल्या पॅन्टेनच्या खिशातील चाकू काढून तिच्या गळयावर चालविला. तीक्ष्ण चाकूने तिचा गळा कापत त्याने तिला बेडवर ढकलून दिले. ती परकर व ब्लाऊजवर असल्याने तशीच गळ्याला धरत ती बेडवर पडली.तिच्या गळ्यातून मोठया प्रामणात रक्तस्त्राव होत असल्याने लागलीच ती जागीच गतप्राण झाली. ती मयत झाल्याची खात्री होताच रात्री मध्यरात्रीच्या सुमारास सचिन याने त्या रूमचा दरवाजा पुढे करून कोणाला काही समजणार नाही अशा बेताने तो तेथून निघून गेला.दुसऱ्या दिवशी त्या रूमची साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्याने रुम उघडून पाहिले असता त्या रुममध्ये ३०शीतील महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली असल्याचे त्याला दिसले त्याने ही घटना हॉटेल मॅनेजरला सांगितल्यावर त्याने या घटनेची माहिती भारती विद्यापीठ पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मयत महिलेची ओळख पटविली. मयत महिला ही करूणा काटमोडे असल्याचे तिच्याजवळ असणाऱ्या पर्समधील कागदपत्रावरून पोलीसांना समजले. पोलीसांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात पाठवून देवून या घटनेची माहिती हॉटेल मॅनेजरकडून व कर्मचाऱ्याकडून घेतली. करूणा काटमोडे ही सचिन शिंदे या इसमाबरोबर सारखी त्या हॉटेलमध्ये येत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस या घटनेचा पंचनामा करीत असताना तिच्या मोबाईलवरती घटनेच्या रात्री सचिन शिंदे याचे फोन आल्याचे दिसून येत होते. संशयीत सचिन शिंदे याचा शोध घेत असताना तो पळून आपल्या भोर या गावी गेल्याचे पोलीसांना समजले. पोलीसांनी त्याचा शोध घेऊन त्याला भोर येथून ताब्यात घेवून त्याला भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनला आणले. पोलीसांनी त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने नाही होय म्हणत आपला गुन्हा कबुल केला.त्याने गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद मयत करूणा काटमोडे हिच्या पतीकडून घेतली. त्याचे फिर्यादीवरून पोलीसांनी करूणा काटमोडे (वय ३०) हिच्या खून प्रकरणी सचिन राजू शिंदे (वय ३२) याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचे कडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास भारती विद्यापीठ पोलीस करीत आहेत.

## तीन महिलांच्या हत्या करून दागिने ...

वयाच्या वृद्ध महिलेवर पडली. ७० वर्ष वयाची द्वारकाबाई किनगाव येथे एकटीच रहात होती. द्वारकाबाईला पती निधनानंतर सरकारी पेन्शन मिळत होते. त्यामुळे तिला फारशी आर्थिक चणचण नव्हती. मुकुंदा लोहार याने ही बाब हेरली होती. वयोवृद्ध द्वारकाबाईला ठार केल्यास तिच्याजवळ असलेली पेन्शनची रक्कम आपल्याला हडप करता येईल असा कुविचार मुकुंदा लोहार याच्या मनात चमकून गेला. द्वारकाबाईच्या अंगावर देखील दागिने रहात होते. तिला ठार केल्यास तिचे अंगावरील दागिने देखील आपल्याला मिळतील हे लक्षात घेत त्याने तिला ठार करण्याचे नियोजन केले. तो तिच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवून होता. ती एकटीच रहात असल्यामुळे तिच्या बचावासाठी कुणी येणार नाही याची त्याला कल्पना आली होती. तिचा मुलगा जळगाव येथे रहात असल्याचे देखील त्याने माहिती करुन घेतले होते. २८ फेब्रुवारी २०२१ रोजी अचानक किनगाव येथील विज पुरवठा खंडीत झाला. विज पुरवठा खंडीत झाल्यामुळे संपुर्ण किनगाव परिसरात अंधार पसरला. या अंधाराचा गैरफायदा घेत त्याने वयोवृद्ध द्वारकाबाईच्या घरात प्रवेश केला. त्यावेळी रात्री सात ते आठचा सुमार होता. घरात गेल्यावर त्याने द्वारकाबाईचा रुमालाने गळा आवळण्यास सुरुवात केली. तिने तिच्या क्षमतेनुसार मुकुंदा लोहार याच्याशी प्रतिकार करण्यास सुरुवात केली. मात्र त्याच्या ताकदीपुढे वयोवृद्ध द्वारकाबाईचा प्रतिकार कमी पडला. काही वेळातच तिने आपले प्राण सोडले. या झटापटीत ती मयत अवस्थेत घरातील संडास बाथरुमच्या मधे पडली. तिच्या चेह-यावर मुकुंदाने ओरबाडल्याच्या खुणा तयार झाल्या होत्या. तिच्या डोक्यास मागील बाजूस मार लागल्याने त्यातून रक्त निघत होते. झटापटीत जवळच भिंतीवरील इलेक्ट्रीकचा बोर्ड तुटून पडला होता. द्वारकाबाई मयत झाल्याचे लक्षात आल्यानंतर मुकुंदाने द्वारकाबाईच्या गळ्यातील पट्टा, सोन्याची पोत, कानातील सोन्याच्या बाळ्या, लोखंडी पेटीचे कुलूप तोडून त्यातील पैसे आदी चिजवस्तू काढून घेत अंधारातच तेथून पलायन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी या घटनेची माहिती परिसरातील लोकांना समजली. त्यांनी मयत द्वारकाबाईचा जळगाव येथे राहणारा मुलगा सुरेश चैत्राम सुरवाडे यास सदर घटनेची माहिती कळवली. द्वारकाबाईची कुणीतरी अज्ञात इसमाने दागिन्यांसाठी हत्या केल्याचा संशय घटनास्थळावर उपस्थित नातेवाईकांच्या मनात बळावला. मात्र त्यावेळी कोरोनाची साथ वेगाने सुरु होती. कोरोनाचा सर्वत्र कहर असल्यामुळे कुणीही या घटनेची पोलिसांना माहिती दिली नाही. द्वारकाबाईवर अंतिम संस्कार करण्यात आले. अशा प्रकारे द्वारकाबाईच्या हत्येच्या गुन्ह्यातून आपली सुटका झाली व हा खून पचला असे मुकुंदा लोहार यास मनोमन वाटले. द्वारकाबाईचे दागिने देखील मिळाल्याने त्याला मनातल्या मनात हायसे वाटले. त्यानंतर बरेच दिवस आणि महिने निघून गेले. कुणीही द्वारकाबाईच्या हत्येची तक्रार यावल पोलिस स्टेशनला केली नाही. प्रत्येक जण आपापल्या कामात लागला. त्यानंतर कोरोनाची लाट देखील ओसरली. त्यामुळे प्रत्येकजण आपले उत्पन्न वाढीसाठी प्रयत्नशील झाला होता. खूनाचा गुन्हा पचला असे समजून मुकुंदा लोहार याचे धाडस वाढले. यापुढे एकट्या राहणा-या वयोवृद्ध महिलांना ठार करुन त्यांचे दागिने आणि रक्कम लुटण्याचे त्याने ठरवले. त्या दृष्टीने तो एकट्यादुकट्या राहणा-या वयोवृद्ध पेन्शनर महिलांना हेरण्याचे काम करु लागला. या घटनेनंतर आठ महिन्यांचा कालावधी उलटला. यावेळी त्याची वक्रनजर किनगाव येथील रुख्माबाई कडू पाटील या ७० वर्ष वयाच्या वृद्धेवर पडली. तिच्या अंगावर सोन्याचे दागिने रहात होते. किनगाव येथील चौधरी वाडा परिसरात राहणा-या या वृद्धेचा मुलगा पारोळा या गावी रहात होता. रुख्माबाई किनगाव येथे एकटीच रहात होती. ती रहात असलेल्या घराजवळ वेल्डींग दुकानावर मुकुंदा काम करण्यासाठी येत असे. वेल्डींगचे काम करत असतांना त्याने रुख्माबाईसह तिच्या घराची रेकी करुन घेतली. आठ महिन्यापुर्वी द्वारकाबाईची सोने व रोख रकमेसाठी ज्याप्रमाणे हत्या केली अगदी तशाच पद्धतीने रुख्माबाईची हत्या करण्याचे त्याने यावेळी देखील ठरवले. तो रुख्माबाईच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवत होता. अखेर रुख्माबाईच्या जीवनातील तो अखेरचा दिवस आला. १९ ऑक्टोबर २०२१ च्या दुपारी दिड वाजताच मुकुंदाने रुख्माबाईच्या घरात प्रवेश केला. गेल्यावेळेप्रमाणे यावेळी देखील मुकुंदाने खूनाचा गुन्हा केला. रुख्माबाईचा रुमालाने गळा आवळून हत्या करण्यात आली. तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेत मुकुंदाने पलायन केले. रुख्माबाई मयत अवस्थेत घरात पडून होती. या घटनेची माहिती मिळताच तिचा नातू शामकांत पाटील व इतर नातेवाईक घटनास्थळी दाखल झाले. रुख्माबाईचा नातू शामकांत पाटील याला आजी रुख्माबाईचा घातपात झाल्याची शंका आली. त्याने तिच्या गळ्यावरील व्रणाचे मोबाईलमधे फोटो देखील काढून घेतले. मात्र दरम्यानच्या कालावधीत रुख्माबाईच्या लहान भावाचे देखील निधन झाले होते. भावाच्या निधनाचा मानसिक धक्का बसल्याने कदाचीत आजीचा मृत्यु झाला असावा अशी सर्वांनी मनाची समजूत करुन घेतली. तरी देखील यावल पोलिस स्टेशनला या घटनेची माहिती देण्यात आली. २० ऑक्टोबर २०२१ रोजी यावल ग्रामीण रुग्णालयात रुख्माबाईच्या मृतदेहाचे पोस्टमॉर्टम करण्यात आले. त्यानंतर आजी रुख्माबाईच्या मृत्युच्या कारणाकडे दुर्लक्ष करत तिचे अंत्यसंस्कार आटोपण्यात आले. पोलिसांनी या घटनेबाबत केवळ अकस्मात मृत्यूची नोंद घेत विषय संपवला. अशा प्रकारे या गुन्ह्यातून देखील आपली सुटका झाली अशी मुकुंदाची समजूत झाली. दुसरा खून देखील पचल्यामुळे मुकुंदाचे धाडस वाढले. आता यापुढे एकट्या दुकट्या पेन्शनर, अंगावर दागिने असणाऱ्या वृद्ध महिलांनाच आपले सावज करण्याचे त्याने मनाशी पक्के केले. दोन खून करुन देखील आपले काहीच वाकडे होत नसल्यामुळे मुकुंदा मनातून खुश होता. मात्र एक दिवस आपले सर्व गुन्हे उघडकीस येणार हे त्याला अद्याप समजलेच नव्हते. पुन्हा दिवसामागून दिवस आणि महिने निघून गेले. सन २०२१ या वर्षात त्याने केलेले खूनाचे दोन गुन्हे अद्यापतरी पचलेले होते. आता वर्ष उलटून सन २०२२ लागले. कोरोनाची दुसरी लाट देखील ओसरली होती. सन २०२२ मधे तिसरा गुन्हा करण्याच्या प्रयत्नात असतांना त्याची वक्रदृष्टी आता किनगाव येथीलच मराबाई सखाराम कोळी या ७० वर्ष वयाच्या वृद्ध महिलेवर पडली. मराबाई कोळी एके दिवशी रेशनचा सामान घेण्यासाठी दुकानावर आली होती. त्यावेळी तिच्याकडे रेशन जास्त असल्यामुळे तिला मदतीची गरज होती. वृद्ध मराबाईस मदत करण्याच्या बहाण्याने मुकुंदाने तिचे सामान उचलून ते तिला घरापर्यंत पोहोचवून दिले. घरापर्यंत रेशनचे सामान घेऊन आलेल्या मुकुंदाने तिच्या घराची यावेळी रेकी करुन घेतली. वृद्ध मराबाई घरात एकटीच रहात असल्याची मुकुंदा लोहार याने पक्की खात्री करुन घेतली. तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरी करण्याचे त्याने मनाशी ठरवले. यापुर्वीचे दोन गुन्हे पचल्यामुळे हा गुन्हा देखील सहज पचून जाईल असे त्याला वाटत होते. २३ मे २०२२ रोजी किनगाव येथील रामराव नगर परिसरात राहणाऱ्या मराबाई सखाराम कोळी (७०) या वृद्ध महिलेचा त्याने रुमालाने गळा आवळला. गळा आवळल्याने जीव गुदमरुन मराबाई जमीनीवर निपचीप पडली. मराबाईने जीव सोडल्याचे समजून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेत मुकुंदाने पलायन केले. शेजारी पाजारी राहणाऱ्या लोकांच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी लागलीच या घटनेची माहिती यावल पोलिस स्टेशनला कळवली. घटनेची माहिती मिळताच यावल पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मराबाईच्या अंगात अद्याप जीव होता. तिचा श्वास कमी अधिक प्रमाणात सुरु होता. तिचा जीव वाचवण्यासाठी तिला लागलीच जळगाव सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरुवातीला या घटनेप्रकरणी यावल पोलिस स्टेशनला गु.र.न. २३५/२०२२ भा.द.वि. ३९२, ३९४ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. उपचारादरम्यान मराबाईचा मृत्यु झाला. त्यामुळे या गुन्ह्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भा.द.वि. ३०२ व ३९७ हे वाढीव कलम लावण्यात आले. या घटनेबाबत पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांनी गांभिर्याने घेत जाणीवपुर्वक लक्ष घातले. त्यांनी घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे घटनास्थळावर हजर झाल्यामुळे लागलीच अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, उप विभागीय अधिकारी कुणाल सोनवणे, सहायक पोलिस अधिक्षक अशित कांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले आदींनी देखील घटनास्थळावर हजेरी लावली. घटनास्थळावर अधिकारी वर्गाला एक चप्पल आढळून आली. या चपलेवरुन आरोपीचा माग काढण्याच्या सुचना पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे यांनी अधिकारी वर्गाला दिल्या. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार बकाले व त्यांच्या पथकावर सोपवण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांच्या मार्गदर्शनाखाली एक शोध पथक तयार करण्यात आले. या पथकात सहायक फौजदार वसंत ताराचंद लिंगायत, सहायक फौजदार युनूस शेख इब्राहिम, पोहेकॉ विजयसिंग धनसिंग पाटील, पोहेकॉ सुधाकर रामदास अंभोरे, पोहेकॉ सुनिल पंडीत दामोदरे, पोहेकॉ दिपक शांताराम पाटील, पोहेकॉ संदिप श्रावण सावळे, पोलिस नाईक किरण मोहन धनगर, प्रमोद अरुण लाडवंजारी, राहुल जितेंद्रसिंग पाटील, ईश्वर पंडीत पाटील आदींचा समावेश करण्यात आला. घटनास्थळावर मिळून आलेली चप्पल कोणत्या डिलरकडून वितरीत झाली याचा शोध स्थानिक गुन्हे शाखेच्या गुन्हे शोध पथकाकडून करण्यात आला. याशिवाय तांत्रीक आणि खबऱ्यांची देखील मदत घेण्यात आली. घटनास्थळावर मिळून आलेल्या चपलेचा डिलर शोधून काढल्यानंतर त्या चपलेचा किनगावपर्यंत कसा प्रवास झाला याचा सर्व तपशील जमा करण्यात आला. चपलेचा किनगाव पर्यंत झालेला प्रवास, तांत्रीक माहितीचे विश्लेषण आणि खबऱ्यांनी दिलेली माहिती आदींची बेरीज जुळल्यानंतर संशयाची सुई मुकुंदा ऊर्फ बाळू बाबुलाल लोहार याच्याकडे जावून थांबत होती. त्यामुळे चौकशीकामी त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याची चौकशी केली असता सुरुवातीला तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. मात्र पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्याने आपला गुन्ह्यांचा घटनाक्रम उलगडण्यास सुरुवात केली. एकामागून एक असे तिन गुन्हे त्याच्या मुखातून उलगडले. पहिल्या गुन्ह्यात मयताच्या नातेवाईकांनी दुर्लक्ष केल्यामुळे त्याचा खून आतापर्यत पचला होता. दुसरा गुन्हा पोलिसांनी केवळ अकस्मात मृत्यूची नोंद घेऊन प्रकरण मार्गी लावल्यामुळे तो देखील आतापर्यत पचला होता. तिसऱ्या गुन्ह्यात मात्र स्वत: पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे यांनी जाणीवपुर्वक लक्ष घातल्यामुळे तो आणी यापुर्वीचे दोन्ही गुन्हे उघडकीस आले. दुसऱ्या गुन्ह्याच्या तपासात हलगर्जीपणा करणा-या संबंधीत अधिकाऱ्यास पोलिस अधिक्षक डॉ. मुंढे यांनी नोटीस दिली आहे. यापुर्वी झालेल्या दोन्ही हत्येप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे यावल पोलिस स्टेशनला दाखल करण्यात आले. तिन्ही गुन्ह्याप्रकरणी तिन वेगवेगळे खूनाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून त्याचा तपास सुरु करण्यात आला. अशा प्रकारे मुकुंदा लोहार हा सिरियल किलर असल्याचे स्पष्ट झाले. त्याला यावल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. यावल पोलिस स्टेशनचे पोलिस अधिक्षक दिलीप भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. खून केल्यानंतर जळगावात विक्री केलेले दागिने पोलिसांनी हस्तगत केले. पोलिस निरीक्षक दिलीप भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक विनोद गोसावी, सहाय्यक फौजदार नितीन चव्हाण, हवालदार जगन्नाथ पाटील, सलीम शेख, उल्हास राणे, सुनील जमदाडे यांच्या पथकाने त्यास न्यायालयात हजर केले. पोलिस कोठडीत असलेल्या सिरियल किलरला सध्या चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणलेल्या या गुन्ह्याचा पुढील तपास यावल पोलिस स्टेशनचे पो.नि. दिलीप भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. विनोदकुमार गोसावी आणि पो.उ.नि.सुनिता कोळपकर करत आहेत.

## सलमान शाहरूखचे नाव वापरून ...

मारेकरी धर्मगुरुंच्याच गाडीत बसून पसार झाले होते. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीची बारकाईने पाहणी केली. घटनास्थळावर फॉरेन्सिक टिम व श्वान पथकास तातडीने पाचारण करण्यात आले. मयत सैय्यद जरीफ चिश्ती यांच्या मारेकऱ्यांच्या शोधार्थ विविध पथकांची निर्मीती करण्यात आली होती. या गुन्हयातील आरोपीतांनी घटनास्थळावरुन पलायन करतांना सोबत नेलेली महिंद्रा कंपनीची एक्सयुव्ही ५०० ही कार दुसऱ्या दिवशी संगमनेर शहरात कारखाना रोड परिसरात मिळून आली होती. त्याप्रमाणे पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी तपास पथकास मार्गदर्शन व सुचना देत अहमदनगर, पुणे व मुंबई जिल्हयात तपास पथके रवाना केली होती. फरार आरोपी हे ठाणे, मुंबई परिसरात गेले असल्याची माहिती संगमनेर शहरात तपास सुरु असतांना मिळाली. खबऱ्याकडून मिळालेल्या त्या माहितीच्या आधारे गणेश उर्फ देवा बाबासाहेब झिंजाड उर्फ पाटील रा. शिंदेमळा, लोणी, ता. रहाता, जि. अहमदनगर, रविंद्र चांगदेव तोरे (ड्रायव्हर) रा. शहाजापुर, कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, पवन पोपट आहेर रा. विठ्ठलनगर, येवला, ता. येवला, जि. नाशिक यांना ताब्यात घेत अटक करण्यात आली. त्यांच्या शोधासाठी तपास पथकाने रात्रभर पाळत ठेवली होती. अटकेतील आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार त्यांनी येवला शहरातील चिंचोडी एमआयडीसी परिसरात एका प्लॉटचे भूमिपुजन करण्याच्या बहाण्याने सुफी ख्वाजा सैय्यद जरीफ चिश्ती बाबा यांना बोलावले होते. या प्लॉटचे जरीफ चिश्ती बाबा यांनी भूमीपूजन केले. त्यानंतर ते त्यांच्या कारमधे बसले. त्याचवेळी आरोपींनी चालकाच्या बाजूने जरीफ बाबा यांच्या डोक्यावर पिस्तुलमधून गोळी झाडली. त्यात ते जागीच ठार झाले. त्यांच्या ताब्यातील कार घेत आरोपींनी पलायन केले. यातील आरोपी तोरे हा जरीफबाबा यांच्या गाडीवर पुर्वी चालक म्हणून कामाला होता. मयत सुफी जरीफबाबा चिश्ती यांनी त्यांचा सेवेकरी गफ्फार अहमद खान याच्या नावावर जमीन व एक्सयुव्ही कार खरेदी केली होती. ती कार व जमीन आपल्या नावावर करुन घेण्यासाठी नियोजन करुन भुमीपुजनाच्या बहाण्याने जरीफ बाबा यांना बोलावण्यात आले. भूमीपुजन झाल्यानंतर गाडीत बसल्यानंतर त्यांची हत्या करण्यात आली. गफार अहमद खान, गणेश उर्फ देवा बाबासाहेब झिंजाड उर्फ पाटील, रविंद्र चांगदेव तोरे (ड्रायव्हर) व पवन पोपट आहेर अशा चौघांना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयाचा पुढील तपास येवला शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मथुरे करत आहेत. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. हेमंत पाटील, येवला शहर पोस्टे चे सपोनि खंडागळे, सपोउनि नाना शिरोळे, पोहवा रविंद्र वानखेडे, जालिंदर खराटे, पोना सुशांत मरकड, सचिन पिंगळ, विनोद टिळे तसेच पोहवा उदय पाठक, प्रशांत पाटील, पोना विश्वनाथ काकड, नवनाथ वाघमोडे, येवला शहर पो.स्टे. चे पोना शहानवाज शेख, गणेश पवार यांच्या पथकाने या तपासकामी कामगिरी केली. गोळीबारात ठार झालेल्या अफगाण वंशाच्या निर्वासित ख्वाजा सय्यद चिश्ती उर्फ झरीफ बाबाने बॉलीवूडच्या तीन खानांच्या नावाचा वापर करुन करोडोंची माया जमवल्याचे पुढे आले आहे. त्याच्या व्हिडीओमध्ये त्याने शाहरुख खान, सलमान खान आणि आमिर खानचा फोटो आणि त्यांचा एडिट केलेला व्हिडीओ वापरुन तगडी कमाई केल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आल्याचे म्हटले जात आहे. आपल्या शब्दांचे पालन करुनच बॉलिवूड मधील तिघे स्टार खान’ मोठे झाल्याचे त्याने व्हिडीओच्या माध्यमातून दर्शवण्याचा प्रयत्न केला होता. या व्हिडिओची मदत घेत या बाबाची कमाई मोठ्या प्रमाणात वाढल्याचे म्हटले जात आहे. झरीफ बाबा आयबी (इंटेलिजन्स ब्युरो)च्या रडारवर आला होता. वावी पोलिसांनी सन २०२१ मध्ये झरीफ बाबा, त्याची पत्नी आणि ड्रायव्हर गफ्फार अशा तिघांची चौकशी केल्यानंतर २२ एप्रिल २०२१ रोजी इंटेलिजन्स ब्युरोला (आयबी) अहवाल सादर करण्यात आला होता. सुफी झरीफ बाबा यांच्या हत्येमध्ये त्याच्या चालकाशिवाय त्याच्या अटेंडंटचाही सहभाग होता. त्याने अन्य दोघांसह हा गुन्हा केला आणि बाबाची एसयूव्ही कार, दोन मोबाईल घेऊन पलायन केले. झरीफ बाबाने त्याच्या व्हिडिओंमध्ये बॉलीवूड अभिनेता शाहरुख खान, सलमान खान आणि आमिर खान या तिघा स्टार्सची नावे आणि छायाचित्रे वापरल्यामुळे फेसबुक, यु ट्युब व इंस्टाग्रामवरील झरीफ बाबाच्या चाहत्यांची संख्या झपाट्याने लाखोच्या घरात गेली होती. झरीफ बाबाने सुरु केलेले त्याचे दोन चॅनल देखील त्याच्या कमाईचे सर्वात मोठे साधन होते. झरीफ बाबाच्या बोलण्याची स्टाईल, लोकांसोबत वागण्याची पद्धत बघून तो प्रसिद्ध होत गेला. त्याच्या एका व्हिडिओंमध्ये तो सूफी पोशाखात नाचताना व झाडूच्या साहाय्याने महिला, लहान मुलांसह वृद्धांना बरे करत असल्याचा दावा केला जात होता. बाबाची संपत्ती वाढत गेल्यामुळे त्याचे अनेक शत्रु देखील निर्माण झाले होते. अनेक मालमत्ता त्याने जवळच्या मित्रांच्या नावावर खरेदी केल्या होत्या.

# ‘बोलवा विठ्ठल’ कार्यक्रमातून पांडुरंगाची अनुभूती





**जळगाव/प्रतिनिधी**

विठ्ठल रूखमाईंच्या वेशभूषमधील चिमुकल्यांची दिंडी, रिंगण सोहळा, पाऊली, ताळ-मृदंगाचा गजर आणि ‘माझा देव पंढरी...’, ‘सुंदर ते ध्यान...’ या भक्ती गितांनी पंढरपूरच्या विठ्ठलाची आराधना करण्यात आली. ‘बोलवा विठ्ठल’ या कार्यक्रमाने पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शनाची अनुभूती जळगावात झाली. भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन व स्व. वसंतराव चांदोरकर स्मृति प्रतिष्ठानतर्फे कांताई सभागृह येथे ‘बोलवा विठ्ठल’ हा भक्तिगीतांचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वनाने झाली. याप्रसंगी स्व. वसंतराव चांदोरकर स्मृति प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विवेकानंद कुलकर्णी, सीए विवेक काटदरे, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे प्रसाद भट, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक मिलिंद बुवा, प्रतिष्ठानचे सचिव अरविंद देशपांडे उपस्थित होते. ‘बोलवा विठ्ठल’ या कार्यक्रमात अनुभूती स्कूल, गोदावरी संगीत महाविद्यालय, शानबाग स्कूल, पलोड शाळा, विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक दीपिका चांदोरकर यांनी केले. गुरूवंदना वरून नेवे यांनी सादर केली. तेजल भट यांनी सूत्रसंचालन केले. अनुभूती इंग्लिश मिडीअम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिंडी, रिंगण व खेळ सादर केले. डॉ अपर्णा भट यांच्या प्रभाकर संगीत कला तर्फे नृत्याची प्रस्तुती करण्यात आले. यावेळी ’गजर, घनू वाजे, कानडा राजा पंढरीचा, अनुभूती गणे, कोण्या गावी हो, माझा देव पंढरी, संतांची या गावी, खेळ मांडियेला, वेढा वेढा रे पंढरी, सुंदर ते ध्यान, चल ग सखे, रखुमाई रखुमाई अनुभूती, धाव घाली आई, विष्णू मय जग, अवघा रंग एक झाला, चंद्रभागेच्या तीरी, अवघे गरजे पंढरपूर’ अशी एकाहूनएक सरस भक्तीगितांची मैफल रंगली. भक्तिगीतांच्या मैफिलीतून साक्षात पंढरपूर अनुभूती रसिकांना झाली. तबला संगत प्रसन्न भुरे, सोहम कुलकर्णी तर हार्मोनियम साथ शौनक दीक्षित याने केली.

# भारत पोलीस समिट आणि अवॉर्ड्समध्ये सोलापूरच्या ‘ऑपरेशन परिवर्तन’ची बाजी

## राष्ट्रीय पातळीवर ग्रामीण पोलीस दलाचा गौरव

**सोलापूर/प्रतिनिधी**



हातभट्टी दारू गाळणाऱ्या ५९४ जणांमध्ये परिवर्तन घडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबविलेल्या ऑपरेशन परिवर्तन उपक्रमाने इंडिया पोलीस समिट आणि अवार्ड्स २०२२मध्ये बाजी मारली आहे. राष्ट्रीय पातळीवरील हा पुरस्कार शुक्रवारी जाहीर झाला आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी हा कौतुकास्पद उपक्रम यशस्वी करून दाखविला आहे. इंडिया पोलीस समिट आणि अवॉर्ड्स २०२२ या दुसऱ्या आभासी आवृत्तीमध्ये चांगल्या. समाजप्रयोगी संकल्पनांची निवड केली जाते. सप्टेंबर २०२१ पासून पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सोलापूर जिल्ह्यात परिवर्तनासाठी प्रयत्न चालविले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील १२० गावांमध्ये ही संकल्पना राबविण्यात आली. आतापर्यंत ८३३ जणांवर ७०७ गुन्हे दाखल केले आहेत. या उपक्रमाची अंमलबजावणी करीत असताना ४ लाख ६२ हजार ५६७ लिटर रसायन नष्ट केले त्याची अंदाजे किंमत १ कोटी ७ लाख ९३ हजार ६७८ इतकी होते. गुन्ह्यांचे आणि विविध घटनांचे निराकरण करण्यासाठी तसेच तंत्रज्ञान सक्षम होण्यासाठी पोलीस दलांतर्गत सर्वोत्कृष्ट उपक्रमांचे कौतुक या ठिकाणी करण्यात येते. कायद्याची अंमलबजावणी, पोलीस दल, सामाजिकशास्त्र, फॉरेन्सिक तज्ञ, सायबर तज्ञ, फ्युचर ऑफ पोलिसिंग या संकल्पनांचा दृष्टिकोन साध्य करण्यासाठी एकत्र येतात. केंद्र सरकारची ही संकल्पना असून सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या ऑपरेशन परिवर्तन या संकल्पनेने यात बाजी मारली आहे.

# भिवंडीमध्ये अपंगांना दुचाकीचे वितरण



**भिवंडी/प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागा मार्फत अपंग व्यक्तींसाठी दुचाकी मंजूर करण्यात आली असून या स्कुटी दुचाकींचे गुरुवारी जिल्हा परिषदेच्या बांधकाम व आरोग्य समितीचे माजी सभापती सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले.

भिवंडीतील कोनगाव येथील राजेश फुलाजी पाटील,पारीवली येथील जितेंद्र हेंदर लसने, दाभाड येथील भावेश विलास पाटील अशा तीन अपंग व्यक्तींना दुचाकी वाहनांचे वाटप यावेळी करण्यात आले.ठाणे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाचे सभापती प्रकाश तेलीवरे यांच्या माध्यमातून या दुचाकींसाठी निधी मंजूर करण्यात आला होता ज्याचे वितरण म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. दुचाकी मिळाल्या नंतर आपला वेग आता वाढणार असून या भावनेने यावेळी तीनही लाभार्थी भावुक झाले होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात मांजरा नदीकाठ वृक्ष लागवड चळवळ पूर्व नियोजित बैठक संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये मांजरा नदीकाठ वृक्ष लागवड चळवळ पूर्वतयारी संबंधी बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अॅड.माधवराव पाटील (टाकळीकर) हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संचालक प्रदीप दिंडीगावे, लातूर वृक्ष चळवळीचे प्रमुख सुपर्ण जगताप, प्रभारी प्राचार्य कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ.श्रीकांत गायकवाड, डॉ.दीपक चाटे, तालुका कृषी अधिकारी डी.ए.राऊत, मंडळ कृषी अधिकारी वाय.बी.दहिफळे, कृषी सहाय्यक एस.पी.पुरी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ.संजय गवई, डॉ. घन:श्याम तडेवाड, डॉ.राजकुमार लखादिवे, डॉ.दिनेश मौने, डॉ.यशवंत वळवी,



डॉ.आनंद शेवाळे, डॉ.सुजित हांडीबाग, डॉ.विनायक वाघमारे, डॉ.मंतोष स्वामी, डॉ.शितल येरुळे, डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, डॉ.मनोहर चपळे, प्रा.वनिता पाटील आणि डॉ.सदाशिव दंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय गवई यांनी जिल्हाधिकारी साहेबांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत सर्वासमोर मांडला. तसेच तालुका कृषी अधिकारी डी.ए.राऊत आणि लातूर वृक्ष चळवळीचे प्रमुख सुपर्ण जगताप यांनीही सविस्तर माहिती दिली. या बैठकीमध्ये दि.१५ जुलैला बोकणगाव व उमरगा येथे प्रत्यक्ष भेट, दि.२४ जुलैच्या रॅलीमध्ये सहभाग, प्रवास व्यवस्था, ४३०० वृक्ष लागवड आदि विविध विषयावर सामूहिक चर्चा करून निर्णय घेण्यात आले. या बैठकीच्या अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव अॅड.माधवराव पाटील (टाकळीकर) म्हणाले की, मांजरा नदीकाठ वृक्ष लागवड चळवळ लोकाभिमुख व्हावी. नदी पुनर्जीवन व नदीकाठी पुरामुळे होणारी धूप व पिकांचे नुकसान टाळावे याकरिता नियोजित वृक्ष लागवड चळवळ ही अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच या चळवळीमध्ये ग्रामस्थ, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी, शासकीय यंत्रणा, सरपंच, ग्रामसेवक, कृषी सेवक, तलाठी, शिक्षक आणि विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा सहभाग घेऊन जनजागृती निर्माण केली पाहिजे त्यामुळे लातूर परिसरात नवचैतन्य निर्माण होईल असे ते म्हणाले. या बैठकीचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य कॅप्टन डॉ.बी.एम.गोडबोले यांनी केले तर आभार डॉ.संजय गवई यांनी मानले. या बैठकीच्या यशस्वितेसाठी राम पाटील, योगेश मोदी आणि शुभम बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून १ हजार विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना शहर शाखेच्या वतीने अंबरनाथ मधील ज्ञान अमृत शाळेत गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून एक हजार विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून काही विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यात आलीये. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना विद्यार्थ्यांच्या अडचणी समस्यांसाठी काम करते. विद्यार्थी सेना विद्यार्थ्यांच्या हितासाठी दरवर्षी वेगवेगळे उपक्रम राबवते समाजाला काही दिन लागतं हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून उल्हासनगर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष मनोज शेलार आणि त्यांचे सहकारी यांनी अंबरनाथ मधील ज्ञान अमृत शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप केले. तसेच काही गरजू विद्यार्थ्यांना ‘लकी ड्रॉ’ च्या माध्यमातून आर्थिक मदत करण्यात आलीये. या शाळेमध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक एकूण १ हजार विद्यार्थी आहेत. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उल्हासनगर शहराध्यक्ष बंडू देशमुख, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष मनोज शेलार, तन्मेश देशमुख सह पदाधिकारी उपस्थित होते.



# अंमली पदार्थासह आरोपी गजाआड; सव्वा किलो गांजा जप्त

वसई : वसई पूर्वेला कामण परिसरात अंमली पदार्थ बाळगणाऱ्या दीपक आद्यप्रसाद सिंग (वय ३२) याला तब्बल एक किलो २८८ ग्रॅम गांजासह वालीव पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. वालीव पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ६५४/२०२२ गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोवैज्ञानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ऍक्ट) चे कलम ८(क) २०(ब) ळळ(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई पूर्वेला कामण परिसरातील मथुरा हॉटेलच्या पाठीमागे आरोपी दीपक सिंग गांजा घेऊन येणार असल्याची खात्रीशीर खबर वालीव पोलीसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने वालीव पोलीस स्टेशनच्या पथकाने रविवारी (दि.३ जुलै) तेथे अचानक छापा टाकला. यामध्ये आरोपी दीपक सिंग याला अटक करण्यात आली. आरोपी हा कामण, रोहित यादव यांची रूम, माळी कंपाऊंड, मथुरा हॉटेलच्या पाठीमागे, वसई (पूर्व) येथील रहिवासी असून मूळ ग्राम शहाबुद्दीनपूर, सुलतानपूर, राज्य उत्तर प्रदेशचा रहिवासी आहे. त्याच्याकडून १० हजार रुपये किमतीचा हिरवट रंगाचा व उग्र वास असलेला गांजा आणि ५०० रुपये रोख मिळून आले आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत चव्हाण हे करीत आहेत.


## जिल्हा परिषद पालघर

### ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/१३/२०२२ दिनांक : १६/०७/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे खानिवली तालुका वाडा येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पुर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक १४/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २७/०७/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**



## जिल्हा परिषद पालघर

### ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/०८/२०२२ दिनांक : १६/०७/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता ग्रामीण, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील अंर्तगत मौजे सासणे, ता. वाडा येथे न.पा.पू. योजना करणे. जि.पालघर निविदा Online द्वारे मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ११/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**




# विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबीर

**वाडा** : लोटस आय हॉस्पिटल आणि लोटस कॉलेज ऑफ ऑप्थोमेट्री , जुहू यांच्या मार्फत रोटरी क्लब ऑफ वाडा आणि रियल सामाजिक, शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने वाडा तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर वाडा तालुक्यातील पी.जे.हायस्कूलच्या के.डी. गंधे सभागृहात आयोजित केले असून सोमवार (दि.११जुलै) ते बुधवार (दि.१३ जुलै) दरम्यान तीस हजार विद्यार्थ्यांचे नेत्र तपासणी करण्याचा मानस असल्याचे अध्यक्ष यांनी सांगितले. १६ जूनपासून तालुक्यातील विविध शाळांमध्ये जाऊन ही तपासणी करण्यात येत आहे. आतापर्यंत स्वजन गार्डी विद्यालय, खैरे आंबिवली, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, वाडा, लिटील एन्जल्स, गुरुकुल, नॅशनल कुडुस या शाळेतील विद्यार्थ्यांची डोळे तपासणी केली आहे. लवकरच तालुक्यातील प्रत्येक माध्यमिक शाळेत या शिबीराचे आयोजन करुन सर्व विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात येईल. कोरोना काळात ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांचा स्क्रीन टाईम वाढला आहे. तसेच लवकर निदान झाल्यास लवकर उपचाराने दृष्टी चांगली करता येवू शकते. यामध्ये संपूर्ण डोळे तपासणी, मोफत चष्मे आणि गरज पडल्यास पालकांच्या संमत्तीने मोफत नेत्र शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. अशी माहिती डॉ. हिरल कोरानी यांनी दिली. एस्सीलॉर व्हिजन फाउंडेशन आणि डेल्टा लेन्स प्रायव्हेट लिमिटेड हे या संपूर्ण शिबीरांचे मुख्य प्रायोजक आहेत. पी.जे. हायस्कूल येथील शिबीरास संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण सोनटक्के, मुख्याध्यापक आर. एस. पाटील सर, उपमुख्याध्यापक बी. के. पाटील सर, रोटरी क्लब ऑफ वाडाचे संस्थापकीय अध्यक्ष शशांक ठाकरे, रियल कॅडमीचे संचालक विशाल ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.


## जिल्हा परिषद पालघर

### ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/ /२०२२ दिनांक :

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे विवलवेढे तालुका डहाणू येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पुर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ११/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**



## जिल्हा परिषद पालघर

### ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/४७/२०२२ दिनांक : १६/०७/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे धुकटन तालुका पालघर येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे सुधारणात्मक पुर्नजोडणी करणे. जि.पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक १५/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २८/०७/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, पालघर**

18 TO 24 JULY 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 16/07/2022 9:54 PM Page 1



# राजकारणी राष्ट्रपती कशाला हवा!

सध्याचं राजकारण म्हणजे एक प्रकारची गटारगंगा आहे आणि या गटार गंगेत नीतिमत्ता, निष्ठा, प्रामाणिकपणा सर्व काही सोडून प्रत्येकजण डुबक्या घेतोय. त्यामुळे राजकारणी कुठल्याही पक्षाचा असो त्याच्याविषयी लोकांना आता घृणा वाटायला लागली आहे. कारण हे लोक कधी जनतेचा गळा कपतील याचा नेम नाही. त्यामुळे अशा लोकांच्या या घाणेरड्या राजकारणापासून जी काही मोठी घटनात्मक पदे आहेत त्यांना दूर ठेवायला हवे आणि म्हणूनच राष्ट्रपती, राज्यपाल, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायधिश हे राजकीय क्षेत्रातील नसावेत. भलेही राष्ट्रपतींची निवड आमदार-खासदार करीत असेल तरी राष्ट्रपती हा राजकारणी नसावा. कारण हे देशातील सर्वोच्च पद आहे आणि राष्ट्रपतींच्या हाती सैन्याच्या तिन्ही दलाची सूत्रे असल्याने हे पद राजकारणी माणसाला देता नये. उलट या पदावर जर राजकारणाच्या बाहेरचा माणूस असेल, तर राजकारणी लोक त्याच काही वाकडे करू शकत नाही. तो राजकारण्यांना पुरून उरू शकतो. पण राजकारणी असेल, तर मात्र तो ज्या पक्षाचा असेल त्या पक्षाचा त्याला अजेंडा राबवावाच लागणार. सध्या भाजपचे सरकारने आहे आणि भाजपची धोरणे भयंकर आहेत. अशावेळी राष्ट्रपती भाजपचा असेल तर भाजप सांगेल तसेच तो करणार जे गेल्या पाच वर्षात रामनाथ कोविंद यांनी केले. यंदाची राष्ट्रपती पदाची निवडणूक एकतर्फीच होणार हे आता स्पष्ट झाले आहे. कारण भाजप प्रणित एनडीए सरकारचे केंद्रात बहुमत आहे. शिवाय अनेक राज्यांमध्ये त्यांची सरकारे आहेत. त्यामुळे द्रौपदी मूर्मु यांचा विजय निश्चित आहे. वाईट फक्त एकच गोष्टीचे वाटते ते म्हणजे आणखी एक महिला राजकारणी देशाच्या सर्वोच्च पदावर स्थानापन्न होणार आहेत. द्रौपदी मूर्मु या ओरिसातील संथाल नावाच्या आदिवासी समाजाच्या आहेत. त्यामुळे देशाच्या प्रमुख पदावर एका आदिवासी महिलेची नियुक्ती होत असेल तर ती खरोखरच आनंदाची गोष्ट आहे. पण माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमाणे द्रोपदिताई सुद्धा राजकारणी आहेत. त्या भाजपा महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष होत्या. ओरिसा विधानसभेत आमदार होत्या. इतकेच नव्हे तर त्यांनी ओरिसातील भाजपा, बिजू जनता दल संयुक्त आघाडी सरकारमध्ये मंत्रिपद सुद्धा भूषविलेले आहे आणि त्यानंतर त्या झारखंडच्या राज्यपाल झाल्या. अशा तऱ्हेने राजकीय पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना राष्ट्रपती आणि राज्यपाल पदावर नियुक्त करणे कितपत योग्य आहे. अगोदरच राज्यसभा आणि विधान परिषद या वरिष्ठ सभागृहांवर राजकारणी लोकांनी कब्जा मिळवला आहे, त्यात आता राज्यपाल आणि राष्ट्रपती हे सुद्धा राजकारणी असतील तर ते त्रयस्थ भूमिकेतून त्यांच्या पडला न्याय देऊ शकतील का? या देशात राजकारणाच्या बाहेरची अशी एकही व्यक्ती राष्ट्रपती होण्यास लायक नव्हती का? उलट राजकारणाच्या बाहेरची व्यक्ती जर राष्ट्रपती असेल तर ती व्यक्ती किती उत्तम प्रकारे त्या पदाचा वापर करू शकते हे दिवंगत एपीजी अब्दुल कलाम साहेबांनी दाखवून दिले. तर राज्यपाल या व्यक्ती बद्दल लोकांच्या मनात किती आणि कशी घृणा निर्माण होवू शकते हे भगत सिंग कोषारी दाखवून देत आहेत. आणि म्हणूनच राष्ट्रपती किंवा राज्यपाल हा राजकारणाच्या बाहेरचा असावा. दुर्दैवाने या देशात ग्राम पंचायतीच्या निवडणुकी पासून राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीपर्यंत राजकारण केले जाते आणि त्या घाणेरड्या राजकारणामुळे या दोन्ही मोठ्या पदांची विश्वासअहर्ता कमी होते. सध्या देशात जे राज्यपाल आहत ते कुठल्या तरी एका पक्षाचे असल्याने ते राजभवनात बसून त्या पक्षाचा अजेंडा पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. त्यांना केंद्रातील ज्या पक्षाच्या सरकारने नियुक्त केले आहे त्या पक्षाशी आणि त्या पक्षाच्या केंद्रातील नेत्यांशी जवळीक साधून राहतात. त्या पक्षाला पूरक असेल तेच करता आणि सगळ्यात जर वाईट काय असेल तर राज्यपाल एखाद्या मुरब्बी राजकारण्यांसारखे वागतात आणि पक्षपाती भूमिका घेतात. हे खरे तर लोकशाहीला मारक आहे आणि म्हणूनच राष्ट्रपती किंवा राज्यपाल यासारख्या सर्वोच्च पदावर राजकारणाच्या बाहेरील व्यक्ती असाव्यात असे जनतेचे म्हणणे आहे. या देशात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचा काही तुटवडा नाही. वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक चांगले आणि कायद्याचं ज्ञान असलेले लोक आहेत, त्यात डॉक्टर, वकील, अभियंते, खेळाडू, उद्योगपती अशा कितीतरी क्षेत्रातील लोक राष्ट्रपती किंवा राज्यपाल बनायला लायक आहेत. त्यामुळे सर्वोच्च पदासाठी अशाच लोकं संधी मिळायला हवी.

# शेतात शंखी गोगलगायी वाढल्यात का?



जिल्ह्यामध्ये सद्यपरिस्थितीमध्ये बऱ्याच ठिकाणी सोयाबीन, कापूस, भाजीपाला व विविध फळबागेमध्ये शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. सोयाबीन,कापूस यासारख्या पिकामध्ये रोप अवस्थेतच गोगलगायीचा प्रादुर्भाव होत असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते, त्यामुळे शेतकऱ्यांनी या गोगलगायींना वेळीच ओळखून खालील प्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल. काही शेतकरी विषारी औषध चोळलेले चुरमुरे शेतात टाकुन त्याव्दारे गोगलगाय नियंत्रणाचा प्रयत्न करीत आहेत. मात्र असे विषारी चुरमुरे खाऊन पशुपक्षी मरण्याचा धोका संभवतो. त्यामुळे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने केलेल्या पुढील शिफारशीप्रमाणे कार्यवाही करुन गोगलगाय नियंत्रण करावे.

**एकात्मिक व्यवस्थापन**

शेताचे बांध स्वच्छ ठेवावे, त्यामुळे गोगलगायींना लपण्यास जागा राहणार नाही. सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिक ठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. लहान शंखीसाठी मिठाची फवारणी किंवा कॅल्शीयम क्लोराईडचासुद्धा नियंत्रणासाठी बर्याच ठिकाणी वापर केला जातो. शेत किंवा बागेच्या सभोवती बांधापासून आत तंबाखू भुकटीचा अथवा चुन्याचा ५ सें.मी. रुंदीचा पट्टा गोगलगायींना शेतात जाण्यास प्रतिबंध म्हणून व नियंत्रणासाठी टाकावा.

फळबागेमध्ये झाडाच्या खोडास १०% बोर्डोपेस्ट लावल्यास गोगलगायी झाडावर चढत नाही. गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड (स्नेलकिल) दाणेदार या गोगलगाय नाशकाचा वापर करावा. सोयाबीन व कापूस यासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड (स्नेलकिल) दोन किलो प्रति एकरी या प्रमाणात शेतात पसरून द्यावे. तर फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड (स्नेलकिल)प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे. शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या (स्नेलकिल) गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. जर हे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे. दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो गूळ अधिक २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबवण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे आमिष शेतामध्ये ढिगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे. सदरील आमिषा पासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे. वरील गोगलगायनाशक अथवा अमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा. अशाप्रकारे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरील प्रमाणे उपाय योजना केल्यास गोगलगायीचे नियंत्रण लवकरात लवकर व अधिक प्रभावीपणे होते. तरी अधिक माहितीसाठी कृषि विभागाशी संपर्क करावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी लातूर यांनी केले आहे.

**- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# 'हर घर झेंडा' अभियानासाठी जिल्ह्यात अंदाजे ४ लाख तिरंगा ध्वजाची गरज!

## निधी अथवा ध्वज विकत घेवून नागरिकांना संस्थांना मदत करावी -जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक, क्रांतिकारी, स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार हर घर झेंडा हा उपक्रम संपूर्ण लातूर जिल्ह्यात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमातंर्गत प्रत्येक घर, शाळा, महाविद्यालये, शासकीय तसेच निमशासकीय कार्यालये, अंगणवाडी, पतसंस्था, सहकारी संस्था, दवाखाने, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत व अंगणवाडीमध्ये दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत ध्वज फडकविण्यात येणार आहे. तेंव्हा, लातूर जिल्ह्यातील सन्मानीय खासदार, आमदार, सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, विविध संघटनाचे नेते, आजी माजी, जिल्हा परिषद सदस्य, सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, म.न.पा. लातूर, नगरपालिका आजी माजी पदाधिकारी, समाजिक संस्था, लोकउपयोगी कामे करणारे दानशुर व्यक्ती, उद्योजक, व्यापारी व व्यावसायिक यांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, हर घर झेंडा उपक्रम लातूर जिल्ह्यात साजरा करण्यासाठी नागरिकांना अंदाजे ४ लाख तिरंगा ध्वजाची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे प्रत्येक ठिकाणी ध्वजारोहण करण्यासाठी निधी अथवा ध्वज विकत घेवून नागरिकांना व संस्थांना मदत करावी असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी केले कले आहे. तसेच ज्या नागरिकांना व संस्थांना ध्वज विकत घेवून मदत करण्याची इच्छा आहे, त्यांनी जिल्हा परिषद पंचायतचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी मो.८७८८४०८०९९, जिल्हाधिकारी कार्यालयातील संकीर्ण नायब तहसीलदार श्रीमती धनश्री स्वामी




मो. ९८२२१२६९४७, लातूर महानगरपालिकेच्या उपायुक्त श्रीमती विना पवार मो. ७७७४००३३३६, नगर परिषद प्रशासन अधिकारी कोकरे मो. ९८२३२२९०३३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रसिद्धीत्रकात म्हटले आहे.

# शेतकऱ्यांनी पीक विमा भरून घ्यावा; शेवटचे १२ दिवस शिल्लक देवणी कृषी विभागाचे आवाहन

**देवणी/प्रतिनिधी**




खरीप हंगाम २०२२ चा पिक विमा भरण्यास सुरुवात झाली असून पिक विमा भरण्यासाठी अंतिम मुदतीची वाट न पाहता तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी वेळेत पिक विमा भरून घ्यावा असे आव्हान तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे यांनी केले आहे. खरीप हंगामातील पिकासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत विमा भरण्याची ३१ जुलै २०२२ ही अंतिम मुदत आहे.पण शेवटच्या टप्प्यात तांत्रिक अडचणी निर्माण होतात, त्यामुळे शेतकरी पीक विमा भरण्यापासून वंचित राहू शकतो त्यामुळे शेतकऱ्यांनी शेवटच्या टप्प्यात गर्दी न करता वेळेत पीक विमा भरून आपले खरीप पिके संरक्षित करून घ्यावे असे कृषी विभागाने कळवले आहे. शेतकऱ्यांनी पीक विमा भरताना आपला मोबाईल क्रमांक इलेक्ट्रॉनिक साक्षांकन करावा, जेणेकरून विमा सहभागाची माहिती एसएमएस द्वारा शेतकऱ्यांना दिली जाईल. सीएससी केंद्र/ बँक यांनी शेतकऱ्याकडून तलाठ्या मार्फत साक्षांकित केलेला सातबारा देण्याचा आग्रह करू नये. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात भारतीय कृषी विमा कंपनी मार्फत कार्यरत पीक विमा सुविधा व सल्ला केंद्रामध्ये व नजीकच्या बँकेत संपर्क साधावा. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची पिक पाहणी या मोबाईल पवर अचूक माहिती नोंदवावी. शेतकऱ्यांनी शेवटच्या टप्प्यात गर्दी व घाई न करता वेळेत आपल्या अधिसूचित पिकाचे विमा संरक्षणासाठी नजीकच्या बँकेत अथवा नागरी सुविधा केंद्रा मार्फत पिक विमा संरक्षण घ्यावे असे असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने व तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे यांनी केले आहे.

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत फळबाग, बांबु व वृक्ष लागवड या घटकांकरिता अर्ज करण्यासाठी शेवटची संधी

**लातूर/प्रतिनिधी**

कृषि विभाग महाराष्ट्र शासन व जागतिक बँक सहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील हवामान बदलामुळे उदभवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करणे, शेतकऱ्यांना शेती पुरक व्यवसाय करण्यास सहाय्य करणे या उद्देशाने जिल्ह्यातील २८२ गावांमध्ये सन २०१८-१९ पासून प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे. या प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड, बांबू लागवड, वृक्ष लागवड या घटकाची सन २०२२-२३ मधील लागवडीसाठी अर्ज करण्याची मुदत सप्टेंबर २०२२ अखेरपर्यंत राहील.

तदनंतर प्रकल्पांतर्गत या घटकाखाली अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सप्टेंबर २०२२ अखेरपर्यंत एकूण प्राप्त अर्जावर निकषानुसार पुर्वसंमती मिळाल्यानंतर पात्र अर्जदारांनी प्रत्यक्ष लागवड नोव्हेंबर २०२२ अखेरपर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे व सदर विषयी संबंधीत शेतकऱ्याने हमीपत्र लिहुन देणे गरजेचे आहे. प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड, बांबू लागवड व वृक्ष लागवड या घटकांचा लाभ घेण्याकरिता प्रकल्प गावातील इच्छूक असलेले शेतकरी बांधवांनी प्रकल्पाने उपलब्ध करुन दिलेल्या संकेतस्थळावर (http://dbt.mahapocra.gov.in) नोंदणी करावी. नोंदणी करताना आवश्यक कागदपत्रांमध्ये संबंधीत शेतकऱ्यांचे आधारकार्ड, सातबारा उतारा, व आठ-अ, मोबाईल क्र. अर्जदार अनुसुचित जाती किंवा जमाती प्रवर्गातील असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, अर्जदार दिव्यांग असल्यास त्याचे प्रमाणपत्र सादर करावे. एकदा नोंदणी केल्यानंतर प्रकल्पातील समाविष्ठ फळबाग लागवड, बांबू लागवड व वृक्ष लागवड बाबीकरीता स्वतंत्र अर्ज करावा. अधिक माहीतीसाठी प्रकल्प गावातील संबंधीत कृषि सहाय्यक किंवा समुह सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. एस. गावसाने यांनी केले आहे.

# बँक सेवेत झालेला बदल तसेच देशाच्या विकास कामात बँकांचा मोठा सहभाग!

**भाग ५**

मित्रहो आपण मागिल सप्ताहात बँकानी जागतीक स्पर्धा ओळखुन ग्राहक हितासाठी कोणता बदल आणि टेक्नॉलॉजीचा वापर केला ते आपण पाहीले. या मुळे आज आपल्या देशातील काही बँका या केवळ आशिया खंडात नाही तर जगभरात आपले पाय रोवून उभ्या आहेत उदाहरण देण्याचे झाले तर आपली भारतीय स्टेट बँक हि ३१ देशात २२९ आपल्या शाखा चालवीत आहे तसेच परकीय चलन (डॉलर, युरो, येन, पाउंड, दिनार इ.) बरोबर हि सक्षम चलने आपल्या देशात व्यवहारात आणुन देशाची आर्थिक बाजू बळकट करीत आहे. त्याच बरोबर आपल्या रुपयाचे हि मुल्यांकन कसे जागतिक बाजारपेठेत वाढेल याकडे गांभीर्याने पाहीले जात आहे. नवीन भारत मिशन, स्टाटप इंडिया, हे देखील आपल्या सरकारने बँकाच्या माध्यमातून प्रगती पथावर आणले आहे. आज आपल्या बँका देशातीलच नाही तर परदेशातही मोठ मोठ्या उद्योगांना अर्ज देऊन आपली आर्थिक बाजू सक्षम करीत आहेत. कारण जेवढी जास्त सुरक्षित कर्ज वाटप तेवढा बँक नफा हा बेसिक फार्मुला होय लघु आणि मध्यम उद्योगांना बँकांचे आर्थिक सहाय्य!

मित्रानो देशाची प्रगती हि त्या देशातील लहान मोठे उद्योग आणि त्यांची जास्तीत जास्त निर्यात यावर अवलंबून असते. आपल्या सरकारने मागिल सात-आठ वर्षात केवळ अन्नधान्य नाही तर कपडा, लहान मोठी इलेक्ट्रॉनिक साहित्य, भांडी, खेळणी, घरगुती वस्तू, औषधे, रासायनिक खते, सैन्य दलातील शस्त्र हत्यारे इतर या सर्व उद्योजकांना बँकांचे आर्थिक पाठबळ सहज दिले आहे.आता सर्वत्र स्थानिक कंपनीला नोंदणी प्रक्रियेत त्रास न व्हावा म्हणून ऑन लाईन द्वारे ही उद्योग नोंदणी करता येते उदा. गूमास्ता लायसन्स, औद्योगिक आधार प्रमाणपत्र, (उद्योग कार्ड) इ. आता आपल्या देशांची लोकसंख्या जवळपास १४० कोटी आहे त्यातील ३०% तरुण आहेत आणि त्यातुन १० ते १५ कोटी तरुण हे व्यवसाय आणि नोकरीच्या शोधात आहेत या सर्वांना उद्योग जगता कडे वळविण्यासाठी केंद्र सरकार अनेक योजना सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयच्या माध्यमातून राबवित आहे. लहान दुकानदार, गाला धारक, घरगुती व्यवसाय, छोटा कारखाना आदी साठी केंद्र सरकार आर्थिक साह्य आणि अनुदान देत आहे. गेल्या पाच वर्षात लाखो तरुणांना या संधीचा लाभ मिळाला आहे. तसेच ही सर्व प्रक्रिया पुर्ण पारदर्शक होत आहे. यात बँकांचे काम मोठे आहे अशा अनेक लघु उद्योगांसाठी शासकीय योजना असल्या तरी त्यांना आर्थिक मदत साह्य देण्याचे काम बँका करीत आहेत. शासकीय नियमानुसार उद्योग लोन धारकांनी कागद पत्र व्यवस्थीत बँकेत जमा केली तर बँक त्वरीत त्यास मंजुरी देते. या लहान उद्योग धारकांनी अनेक क्षेत्रांत आपली यशस्वी कामगिरी केली आहे जिल्ह्यांत आणि राज्यात त्यांनी आपला व्यवसाय विस्तार केला आहे. बँक पुढे जाऊन या उद्योजकाला अनेक सवलती देत असते जेणे करून तो आपला व्यवसाय निट करू शकेल कारण त्यांच्या धंद्यावर अनेक नोकर वर्ग पोट भरत असतो. देशातील प्रत्येक राज्यात या लहान उद्योग धंद्यांना प्राधान्य तेथील राज्य सरकार ही देत आहेत. पुर्वी शेती हा व्यवसाय मुख्य होता तो आहेच पण बाजारातील लागणारी वस्तूंची मागणी पाहता ती तेथेच जिल्ह्यात तयार करून विकणे हे सोयीचे होते आहे.तसा प्रयत्न सुरू आहे यामुळे स्वयं रोजगार उपलब्ध होतो आणि माणूस हा केवळ शेतीवर अवलंबून राहत नाही. लहान उद्योग निर्माण करण्यासाठी लागणारी संपुर्ण माहिती आपणास शासकीय वेबसाईट अथवा गुगलवर सर्च केल्यास प्राप्त होते. त्यासाठी समग्र माहिती ज्ञान, लागणारी पात्रता, कार्य कौशल्य, मनुष्य बळ, जागा आणि बाजार पेठ यांचा प्रामुख्याने विचार केला जातो अनेकांनी आपल्या ग्रामीण जागेत शेळी,मेंढी, कुक्कुटपालन असे लघू व्यवसाय सुरु केला आहे या साठी सर्व बँका संपूर्ण येणारा खर्च उपलब्ध करून देत आहेत. आपणास याबरोबर जोड धंदा देखील करता येतो त्यास मान्यता घेऊन बँका अल्प दराच्या व्याजाने कर्ज उपलब्ध करून देत आहेत. भारतात अनेक जाती धर्माचे, प्रांतातील लोक एकत्र राहतात प्रतेक जण हा आपल्या आवडीनुसार आणि सोयी नुसार नोकरी, धंदा करीत आहे या लहान उद्योगांना सावरणे आणि पुढे आणणे यासाठी देशातील बँकानी जवाबदारी घेतली आहे फक्त करोना महामारी सारखे पुन्हा कोणते संकट येणे नको अन्यथा देशात मोठी आर्थिक मंदी येऊ शकते. आज येवढेच पुढिल भागात आपण बँकेत चालणारे सरकारी कामकाज आणि यात नफा तोटा पाहूया. धन्यवाद! जय हिंद! **(क्रमशः)**



**- नंदकिशोर नरसिंह पवार, वसई रोड**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

18 TO 24 JULY 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 16/07/2022 9:55 PM Page 1



## शिक्षण तथा, सहकारमहर्षी स्व.रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्य भव्य रक्तदान शिबीर संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

शिक्षण तथा सहकारमहर्षी स्व.रामचंद्रराव पाटील तळेगावकर उर्फ भाऊसाहेब यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्य दिनांक १२ जुलै रोज मंगळवारी देवणी तालुक्यातील वलांडी येथिल श्री व्यंकटेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयात लोकजागृती शिक्षण संस्था वलांडी व अंबरखाने ब्लड बँक, उदगीर यांच्या संयुक्त विदयमाने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात ७१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. या शिबीराचे उदघाटन लोकजागृती शिक्षण संस्थेचे सचीव तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर, अध्यक्ष व्यंकटराव पाटील वलांडीकर, उपाध्यक्ष अण्णाराव पाटील, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष हणमंत बिरादार, माजी जिल्हापरिषद सदस्य प्रशांत पाटील, स्व.रामचंद्रराव पाटील खरेदी विक्री संघ, उदगीरचे चेअरमन भरत चामले, पंचायत समिती देवणीचे माजी उपसभापती शंकरराव पाटील तळेगावकर, तालुका सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष सदाशिवराव पाटील तळेगावकर, पोलीस पाटील संभाजी पाटील, माजी नगरसेवक भाजपा युवानेते शहाजी पाटील, शिवाजी पाटील, तानाजी पाटील, प्रा.विश्वजीत पाटील मोर्तळवाडीकर, हरी पाटील, युवराज देवणे, धनराज देवणे, विनायकराव पाटील, चंद्रशेखर महाजन, बिलास बंग, बालाजी बिरादार, राजकुमार शिंदे, रामेश्वर बिरादार आदी उपस्थित होते.

यावेळी शिबीराचे उदघाटन करताना भगवान पाटील तळेगावकर म्हणाले रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानामूळे रूग्णाला जीवदान मिळत आसते त्यामूळे सर्वानीच रक्तदान करण्यासाठी पुढे यावे आसे मत व्यक्त केले. या शिबीरासाठी मुख्याध्यापक माधव मांजीबाळे, पर्यवेक्षक रणजित पाटील, धनाजी पाटील, मुख्याध्यापक राजकुमार बिरादार, प्राचार्य वाघबंर कांबळे, पर्यवेक्षक दत्ता अचवलकर, उपप्राचार्य धनाजी राजे, अंकुश मूळे, गंगाराम भद्रे, सुनील क्षीरसागर, धनाजी पाटील, आदींनी सहकार्य केले.

## दारूच्या बाटल्यांसह कर्नाटकातील चोरीची बोलेरो गाडी जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील फुलचिंचोली येथील बिअर शॉपी फोडल्याप्रकरणी एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून ५६ हजार ३४० रुपयांची दारू आणि कर्नाटक राज्यातील चोरीला गेलेली ७ लाखांची महिंद्रा बोलेरो जीप सोलापूर स्थानिक गुन्हे शाखा व पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केली आहे. याप्रकरणी मोहोळ तालुक्यातील ढोक बाभूळगाव येथील महंमद मधुकर पवार याला अटक करण्यात आली असून, बंदेनवाज ऊर्फ बंड्या उर्फ मधुकर पवार, शंकर उर्फ हाड्या मधुकर पवार व बिच्या गोटीराम काळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फुलचिंचोली येथील महेश बिअर शॉपीमध्ये ९ जुलै रोजी चोरी झाली होती. यावेळी ६६ हजार रुपयांचे २५ बियर बॉक्स लंपास करण्यात आले होते. या घटनेचा तपास करताना पंढरपूर तालुका पोलिसांना आरोपी दक्षिण सोलापूर येथील मुळेगाव येथे येणार



असल्याची माहिती मिळाली. तेथे पोलिसांनी सापळा रचून महम्मद पवार यास अटक केली. यावेळी त्याच्याकडून कर्नाटकातून चोरीला गेलेली महिंद्रा बोलेरो जीप (केए ३२ एन ३२८) देखील ताब्यात घेण्यात आली. या बोलेरोमध्ये ५६ हजार रुपयांच्या चोरीस गेलेल्या बियरच्या बाटल्या आढळून आल्या आहेत. सदर आरोपीला चार दिवसाची पोलीस कोठडी मिळाली असून अधिक तपास हवालदार नितीन चवरे करीत आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगले, पोलीस हवालदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अंमलदार धनराज गायकवाड, चालक समीर शेख व पंढरपूर तालुका पोलिसांनी केली आहे.

## वाडा बस स्थानकात वृद्धेची हत्या करणाऱ्या आरोपीला अटक

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा शहरात भीक मागून उदरनिर्वाह करून बस स्थानकात झोपणाऱ्या वृद्ध महिलेच्या डोक्यात दगड घालून निर्घृणपणे हत्या करणाऱ्या आरोपीला वाडा पोलीसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे. १२ जुन रोजी रात्रीच्या सुमारास क्षुल्लक कारणावरून इंदुरा वाघ वय ६५ वर्षे या वृद्धेच्या डोक्यात दगड आपटून हत्या करून फरार झालेला आरोपी अभिमन्यू सवरा याला पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे व इतर कर्मचाऱ्यांनी मोबाईलचा लोकेशन ट्रेस करून अटक केली आहे. नशेच्या आहारी गेलेल्या अभिमन्यू सवरा याने वृद्ध महिलेच्या डोक्यात दोन वेळा दगड आपटून तिला ठार मारले व तिचा मृतदेह बस स्थानकाच्या मागे फरफटत नेऊन टाकला त्या नंतर तो वेगवेगळी ठिकाणे बदलत पळत होता. गोपनीय माहितीनुसार आरोपी त्र्यंबकेश्वर येथील बस स्टँड समोरील मनोज भेळ पुरी दुकानं समोर येणार आहे अशी खात्रीशीर खबर मिळताच प्रभारी अधिकारी दशरथ पाटील यांनी सदर बाबत खात्री करुन, कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले त्यावरून पोलीस उपनिरीक्षक ढोले यांनी त्र्यंबेश्वर येथे मिळालेल्या माहितीप्रमाणे जावुन गुप्त पणे पाहणी केली असता, एक इसम संशयास्पद रित्या बसलेला दिसला. सदर इसमास ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अभिमन्यू सुदाम सवरा वय २२ वर्ष रा. गांद्रे असे सांगीतले. त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे बस स्टँड वाडा येथील खूना बाबत विचारले असता त्याने खून केल्याचे कबूल केल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रकाश गायकवाड, पोलिस उपअधीक्षक, प्रशांत परदेशी, पोलिस निरीक्षक दशरथ पाटील वाडा पोलिस ठाणे यांचे मार्गदर्शना खाली केली आहे.

## जेऊर भागात १२ तलवारी बाळगणाऱ्या ११ जणांना अटक

**सोलापूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाने नुकतीच राज्यातील नगरपालिका यांचा निवडणुक कार्यक्रम जाहिर केला आहे. त्या अनुषगाने सोलापूर जिल्हयात आदर्श आचार संहिता जाहिर झालेली आहे. सदर आचार संहितेचे कोटेकोरपण पालन होवून शांतता व भयमुक्त निवडणूका पार पाडण्यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांना जिल्हयात अवैध शस्त्र बाळगणारे लोकांवर कारवाई करण्याबाबत आदेश केले आहे. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोलापूर ग्रामीण सुहास जगताप यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक धनयंज पोरे यांच्या पथकास अवैध शस्त्र बाळगणारे लोकांबाबत कारवाई करण्याबाबत सुचीत केले होते. त्यावरून सपोनि पोरे यांच्या पथकास अक्कलकोट तालुक्यातील जेऊर भागामध्ये पंजाब



राज्यातून एक इसम अवैधपणे तलवारी मागवून घेवून तो सदर भागातील लोकांना विक्री करत असल्याबाबतची बातमी समजून आली होती. सदर बातमीची पडताळणी करण्यासाठी सपोनि पोरे व पथकाने जेऊर गावात जावून पंजाबमधून तलवारी मागवून विक्री करणारे इसमास ताब्यात घेतले. त्याचेकडे विचारपूस करता त्याने सुरूवातीस उडवा उडवीची उत्तरे दिली. परंतू त्यास अधिक विश्वासात घेवून तपास केला असता त्याने फ्लिपकार्ट या ऑनलाईन वेबसाईटवरून पंजाब राज्यातून तलवारी मागवून घेतल्या असून सदरच्या तलवारी या अक्कलकोट तालुक्यातील जेऊर, पानमंगरूळ, करजगी व अक्कलकोट शहरातील व दक्षिण सोलापूर तालुक्यातील बंकलगी गावातील लोकांना विक्री केली असल्याची कबूली दिली. त्यावरून सदर तलवारी विकत घेणारे लोकांचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध घेतला. सदर इसमांना ताब्यात घेवून त्यांचेकडून जेऊर येथील इसमाकडून विकत घेतलेल्या एकूण १२ तलवारी जप्त करण्यात आले आहेत. त्यामध्ये वेगवेगळ्या आकाराच्या व लांबी-रूंदीच्या एकूण २६, १००/- रूपये किंमतीच्या जप्त करण्यात आलेल्या सदर फ्लिपकार्ट या ऑनलाईन वेबसाईटवरून तलवारी मागवणारा व विकत घेणारे असे एकूण ११ लोकांविरूध्द अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेस गु.र.नं.३९२/२०२२, भारतीय शस्त्र अधिनियमचे कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब काकडे अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप सोलापूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि धनंजय पोरे, सहा.फौ.श्रीकांत गायकवाड, निलकंठ जाधवर, पोह सलीम बागवान, विजय भरले, हरीदास पांढरे, पो.ना.रवि माने सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांनी पार पाडली आहे.

## दहा घरे फोडणाऱ्या दोन मित्रांना सोलापूर शहर गुन्हे शाखेने केले जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर व परिसरात दहा घरफोड्या करणाऱ्या दोघा चोरट्यांना सोलापूर शहर गुन्हे शाखेने जेरबंद केले असून त्यांच्याकडून १३७ ग्रॅमचे सोन्याचे दागिने, नऊ लाखांचे रोकड व रिव्हॉल्व्हर असा सुमारे २६ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. या दोघा चोरट्यांनी चोरीच्या पैशातून सुमारे ४० लाखांची मालमत्ता कमावल्याचे उघडकीस आल्याची माहिती सोलापूर शहर पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) बापू बांगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. उमेश विठ्ठल खेत्री (वय ३५) व लव सुरेश सासवे (वय २९) अशी अटक करण्यात आलेल्या दोघा चोरट्यांची नावे आहेत. हे दोघे एकमेकांचे मित्र व नातेवाईक आहेत. खेत्री याच्यावर चोरी, घरफोडी, जबरी चोऱ्या, कॉन्टॅक्ट किलिंग, दरोडा असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तो जुलै २०२० पासून बेळगाव येथे जेलमध्ये होता. तेथून सुटल्यानंतर तो ४ महिने तिथेच राहिला. गेल्या दीड वर्षापासून तो जुळे सोलापुरात भाड्याने खोली करून राहत आहे. या दोघांनी रात्रीच्या वेळी १० बंद घरे फोडली आहेत.

२०२१ व २०२२ या दीड वर्षाच्या कालावधीत त्यांनी चोऱ्या केल्या आहेत. परंतु ते पोलिसांना सापडत नव्हते. गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार संताजी रोकडे व भारत पाटील यांना मिळालेल्या माहितीवरून पोलीस अधिकाऱ्यांनी या घरफोड्या उघडकीस आणल्या आहेत. त्यांना सोलापुरात अटक केल्यानंतर त्यांच्याकडून ९ लाखांची रोकड, १३७ ग्रॅमचे सोन्याचे दागिने, ५८३ ग्रॅम चांदीचे दागिने असा २५ लाख ९३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. उमेश खेत्री याने चोरीच्या पैशातून अक्कलकोट तालुक्यातील चुंगी येथे ८ लाखांची शेती, दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड येथे भाऊजी व पत्नीच्या नावे २४ लाख २५ हजाराची शेती, सोलापूर शहरातील दामलेवस्ती येथे सासू व पत्नीच्या नावे साडेचार लाखांचा प्लॉट, भाऊजींच्या नावे कीर्तीनगर येथे ९० हजारांचा प्लॉट, भावाच्या नावाने ३५ हजारांची दुचाकी गाडी, नातेवाईकांच्या नावे २२ हजारांची दुचाकी, नातेवाईकांच्या नावे ५ लाख ८० हजारांचे दोन कार अशी सुमारे ४४ लाखांची मालमत्ता खरेदी केल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रीती टिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळंके, संजय क्षिरसागर, श्रीनाथ महाडिक, संदीप पाटील यांच्या पथकाने केले आहे.

## शोध व सुटका, पूर प्रतिसाद याची आपत्ती व्यवस्थापनाकडून रंगीत तालीम

**लातूर/प्रतिनिधी**



बनशेळकी ता. उदगीर येथील धरणात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मार्फत आपत्ती व्यवस्थापनाची मेगा मॉक करण्यात आले. प्रशासनाकडून पूर परिस्थिती यामध्ये विविध स्तरावरील शासकीय यंत्रणा प्रामुख्याने महसूल, पोलीस, आरोग्य, पाटबंधारे विभाग ई. एखादी आपत्ती कोसळली तर त्यास त्यांचा त्या घटनेस प्रतिसाद, व तसेच पोलीस पंचनामा, प्रथमोपचार ई. घटनाक्रमाची रंगीत तालीम करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दांडाधिकारी पृथ्वीराज बी. पी. उपस्थित होते. जिल्ह्यात यंदा मान्सूनची दमदार सुरुवात झाली असून सर्वदूर संततधार पाउस पडत आहे. मान्सून पूर्वतयारी च्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी बुधवारी रंगीत तालमीच्या माध्यमातून आढावा घेण्यात आला. यावेळी नागरिक व शासकीय यंत्रणेला आपत्ती प्रतिसादाबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साक़ेब उस्मानी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पुरात अडकलेल्या व्यक्तींचा शोध घेऊन त्याची सुटका करणे तसेच वाहून चाललेल्या व्यक्तीचे बचाव करणे, त्यांना स्थलांतरीत करणे, प्रथमोपचार करणे या बाबी प्रात्याक्षिकांच्या माध्यमातून करून घेण्यात आले. यावेळी महसूल, पोलीस, आरोग्य पाटबंधारे विभाग, जिल्हा शोध व बचाव पथकातील सदस्य व संबंधित विभागांनी त्यांची भूमिका समजून घेण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा दांडाधिकारी श्री. पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले. तसेच आपत्तीची पूर्वसूचना देऊन नागरिकांना आपत्ती प्रवण भागात न जाण्याच्या सुचना देणे अत्यंत महत्वाचे असल्याचे उदगीरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांनी सर्व यंत्रणेस सांगितले. सदर रंगीत तालिमी मध्ये एखादी आपत्ती जर अचानकपणे कोसळली तर सर्व यंत्रणा सज्ज रहावी याचा अभ्यास घेण्यात आला. यात सर्वच यंत्रणांनी चांगला प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास स्थानिक नागरिकांची गर्दी जमली होती. ही रंगीत तालिम जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांच्या सुचनेनुसार व निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी यांनी संचलित केली. याबाबतचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडून संबंधित विभाग प्रमुखांसह शासनास सादर करण्यात येणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार उदगीर रामेश्वर गोरे, तहसीलदार जळकोट, सुरेखा स्वामी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, उपजिल्हा रुणालय उदगीर येथील डॉ कुलकर्णी, राखीव पोलीस उपनिरीक्षक दिलीप माने उपस्थित होते.. सदर रंगीत तालिमीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी, लातुरचे अग्निशमन अधिकारी शेख जाफर, उदगीरचे अग्निशमन अधिकारी विशाल आलटे, निलंग्याचे अग्निशमन अधिकारी गंगाधर खरोडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे गोपाळ शिंगडे, श्रीराम वाघमारे, किरण जाधव, करीम शेख, ए. एन. भालेराव, वाहन चालक राठोड, रफीक ई. यांनी विशेष परिश्रम घेतले.


**जिल्हा परिषद पालघर**

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/४/२०२२ दिनांक : १५/०७/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील जल जिवन मिशन कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत मोखाडा तालुक्यातील चारणवाडी येथे वितरण व्यवस्था करणे. या कामांची Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ११/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १८/०७/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-

(जी.पी. निवडंगे)

कार्यकारी अभियंता

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

जिल्हा परिषद, पालघर


## सोलापूरमध्ये पेंटर कडून चोरीच्या दहा दुचाकी जप्त



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरात पेंटरचे काम करणाऱ्या शफी मौला शेख (५२) याला शहर गुन्हे शाखेने अटक करून त्याच्याकडून चोरीच्या दहा दुचाकी जप्त केल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त प्रीती टिपरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. दुचाकी चोरणारा शफी हा चोरीच्या दुचाकी घेऊन कुमठा नाका परिसरातील पारसी विहिरीजवळील महापालिकेच्या बस थांब्याजवळ उभा असल्याची माहिती खबऱ्याकडून पोलिसांना मिळाली होती. सोलापूर शहर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व त्यांच्या पथकाने आठ जुलैला त्या ठिकाणी सापळा रचून पकडले त्याने होम मैदान, गणपती घाट, रूपाभवानी मंदिर अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून १० दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पत्नीच्या आजारपणामुळे दुचाकी चोरल्याचेही त्यांनी पोलिसांना सांगितले त्याच्याकडील संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

## वार्षिक उत्सवानिमित्त हिरेमठ संस्थानमध्ये शिवकथा

औसा : हिरेमठ संस्थांनच्या आषाढ मासी वार्षिक उत्सवानिमित्त प्रति वर्षाप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १६ जुलै पासून अखंड शिवनाम सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले असून या सप्ताह कालावधीमध्ये ष.ब्र १०८ श्री अमृतेश्वर महाराज जिंतूरकर यांच्या अमृतवाणीतून दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये शिव कथा आयोजित करण्यात आली आहे.हिरेमठ संस्थानचे लिंगेक्य गुरु निरंजन शिवाचार्य महाराज यांच्या आशीर्वादाने आणि १०८ डॉ.शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थांनचे पिठाधिपती ष.ब्र. १०८ श्री निरंजन शिवाचार्य महाराज यांच्या अधिपत्याखाली उज्जैन पिठाचे श्रीमद जगद्गुरु श्री.श्री.श्री १००८ सिद्धलिंग राजदेशीकेंद्र महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात दिनांक २३ ते २५ जुलै या कालावधीमध्ये आशीर्वचन आयोजित करण्यात आले आहे. उज्जैन पिठाचे जगद्गुरु यांच्या सानिध्यामध्ये इस्टलिंग महापूजा आणि शिवदीक्षा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले असून हिरेमठ संस्थांनच्या वतीने आषाढमासी वार्षिक उत्सवानिमित्त आयोजित अध्यात्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी कार्यक्रमास व महाप्रसादास भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

18 TO 24 JULY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 16/07/2022 9:56 PM Page 1



पान १ वरून...

## दारूच्या पार्टीतच आयुष्याचा खेळ ...

सुरेश जालगर याने आपल्या नावाने म्हणजे सुरेश गॅंग नावाची टोळी बनविली होती. तो ही मडगाव शहरातील आझादनगर येथील शेवटच्या गल्लीत राहयला आहे. मुख्तार बदानी आणि त्याच घनिष्ट संबंध निर्माण झाल्याने ते दोघे ही जेवायला प्यायला एकत्र बसत होते. त्यातून त्याची मैत्री ही बहरत होती. परंतु ही मैत्री बहरत असताना मागे एकदा त्या दोघात किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यावेळेपासून मुख्तार बदानी हा त्याचेशी बोलत नव्हता.हा वाद काही मोठा नव्हता. तो किरकोळ वाद होता. सुरेश जालगर हा त्याचे घरी नेहमी येत जात असल्याने त्याची नजर मुख्तार बदानी याच्या बहिणीवर पडली होती. तो तिच्याशी सलगी वाढविण्याचा तिला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करीत असल्याचे मुख्तार याच्या लक्षात आल्यावर त्याने त्याला याचा जाब विचारला होता. यातूनच त्या दोघात वितुष्ट निर्माण झाले होते. त्यावेळी मुख्तार याने त्याला तू माझ्या घरी येवू नकोस आणि माझ्याशी बोलू ही नकोस असे सांगितले होते. मुख्तारने त्याला असे सांगणे सुरेश जालगर याला पटले नव्हते. कारण तो राहत असलेल्या आझादनगर गल्लीतील पहिल्या गल्लीपासून ते शेवटच्या गल्लीपर्यत त्याची दादागिरी चालत होती. त्याची त्या भागात दशहत असल्याने त्याच्या विरोधात कुणी बोलत नव्हते. त्यातच मुख्तार याने त्याला असे बोलल्याने तो त्याचेवर चिडला होता. मैत्रीत काही तरी खोट काढून मुख्तार आपल्याशी संबंध तोडत आहे हे त्याला खटकत होते. आपली या भागात दशहत असताना तो आपल्याला घाबरत नाही, उलट आपल्यालाच दम देतो त्याला चांगलेच बघितले पाहिजे हे त्याने मनात ठरविले होते. मुख्तार याला आपण कोण आहे हे दाखवून दयायचे म्हणजे परत तो आपल्या वाटेला जाणार नाही यासाठी तो संधी शोधत होता. आझादनगर भागात राहणारे त्याचे इतर साथीदार त्याच्या शब्दाच्या बाहेर नाहीत याची त्याला खात्री होती.त्याने आपल्या गॅंगमधील विनोद जालगर, अक्षय भोवे, मोहमद हुसेन शेख, आसिफ नागराची यांना मुख्तार याची गेम करायची आहे असे सांगितले. हे चार जण ही मुख्तार याला चांगले ओळखत होते. विनोद जालगर हा चप्पल दुकानात सेल्स मॅनेजर म्हणून काम करीत होता. तर अक्षय भोवे हा एका नृत्य शाळेत नृत्य शिक्षक म्हणून काम करीत होता. मोहमंद हुसेन शेख हा कापड दुकानात सेल्समन म्हणून काम करीत होता. आसिफ नागरची हा कापड विक्रेता होता. या सर्वानी मिळून मुख्तार याला धडा शिकविण्याचे ठरविले. तशा संधीच्या ते शोधात असताना त्यांना संधी ही लवकरच मिळाली. मुख्तार बदानी हा आपला ३० वाढदिवस बुधवार दि.१३ रोजी आपल्या घराशेजारील मोकळ्या जागेत आपल्या इतर मित्रासह रात्री ११ ते १२ च्या दरम्यान साजरा करायला आला. त्यावेळी तेथे सुरेश जालगर हा आपल्या मित्रासह पोहचला होता. मुख्तार याची वाढदिवसाची पार्टी चालली होती. सुरेश जालगर आणि त्याचे मित्र तेथे आल्यानंतर मुख्तार याने त्यांना देखील पार्टीत सामील होण्यास सांगितले. परंतु ते तेथे वेगळ्याच कारणाने आल्याने त्यांनी पार्टीत सामील न होता, उलट मुख्तार याच्याशी भांडण काढीत त्याला तु आम्हाला तुझ्या वाढदिवसाला का बोलविले नाहीस म्हणून वाद घालू लागले. मागील भांडणाचा राग मुख्तार याने मनात धरला आहे म्हणून त्याने पार्टीत वाढदिवसाला आपल्याला बोलविले नाही असे सुरेश गॅंग मधील अक्षय भोवे याने म्हणताच सुरेश जालगर याने मुख्तार याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्या ऐवजी त्याला शिवीगाळ करीत वाद घालू लागला. मुख्तार हा आपल्या इतर मित्रासोबत वाढदिवस मोठया आनंदात साजरा करीत असताना तेथे सुरेश जालगर आणि त्याचे इतर मित्र येवून त्यांनी त्याला गालबोट लावले होते. मुख्तार बरोबर त्याचा वाद चालू असताना सुरेश जालगर आणि त्याच्या मित्रांनी त्याला मारहाण करायला सुरूवात केली. सुरेश गॅंगमधील जालगर याचे मित्र तयारीनेच आल्याने त्यांनी मुख्तार याला लोखंडी रॉडने मारहाण करीत त्याला खाली पाडले. त्यातच आसिफ नागरची याने आपल्या हातातील कडयाने मुख्तार याच्या मानेवर मारले. त्यासरशी मुख्तार याच्या मानेतून रक्तस्त्राव सुरू झाला. या सगळया गोंधळात मुख्तार याला वाचविण्यासाठी त्याचे मित्र पुढे आले त्यांना ही जालगर आणि त्याच्या मित्रांनी मारहाण करून पिटाळून लावले. ते पळून गेल्यावर जालगर सुरेश जालगर याने परत मुख्तार याच्यावर लोखंडी रॉडने प्रहार केला. त्यासरशी त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. मुख्तार हा रक्ताच्या थारोळ्यात पडल्याने सुरेश जालगर याच्या मित्रांनी आपली दशहत दाखविण्यासाठी तीन मोटार सायकली ही जाळून टाकल्या. या घटनेनंतर सुरेश गॅंगमधील सर्वजण घटनास्थळावरून पळून गेले. ते गेल्यानंतर जखमी मुख्तार याला त्याच्या घरच्या लोकांनी जवळ्या एका दवाखान्यात उपचारासाठी नेले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यूं झाल्याचे त्याच्या नातेवाईकांना सांगितले. मुख्तार याचा खून सुरेश गॅंगमधील तरूणांनी केल्यचो समजाताच मडगाव पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनाम करून या घटनेचा तपास चालू केला.रात्री उशिरा या घटनेची मडगाव पोलीस स्थानकात नोंद करण्यात आली. सुरेश जालगर गॅंगमधील तरूणांनी मुख्तार याला मारून टाकल्याचे समजताच मुख्तार बदानी याच्या नातेवाईकांनी आणि भागातील नागरिकांनी मडगाव पोलीस स्थानकात जमाव करून या घटनेतील संशयीत आरोपीना ताब्यात घेतल्या शिवाय आम्ही मुख्तार याचा मृतदेह ताब्यात घेणार नाही. तसेच त्याचा मृतदेह पोलीस स्टेशनाच्या आवारात आणू असे पोलीसांना सांगितले. तर या घटनेतील एका संशयीताला ताब्यात घेतल्याचे नातेवाईकांना समजल्यावर ते आणखीन प्रक्षुब्ध झाले. सुरेश जालगर आणि त्याच्या गॅंगमधील तरूणांनी आपल्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या माध्यामातून आझादनगर परिसरात दशहत निर्माण करून मुख्तार सारख्या चांगल्या व्यक्तीचा किरकोळ कारणातून खून केल्याचे त्याचे म्हणणे होते. पोलीस स्टेशनवर आलेल्या मयत मुख्तार याच्या नातेवाईकांची वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी समजूत घालून या घटनेतील कोणाला ही पाठीशी घालणार नाही या घटनेती संशयीत आरोपीना ताब्यात घेऊन त्यांना कडक शिक्षा होणेसाठी प्रयत्न करू असे सांगितल्याने जमाव शांत झाला होता. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली आहे याची पोलीसांना माहिति मिळाल्याने घटनेनंतर काही तासातच या घटनेतील सुरेश जालगर, विनोद जालगर अक्षय भोवे, आसिफ नागरची आणि मोहमंद शेख यांना ताब्यात घेतले. त्याचेकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत मुख्तार बदानी (वय ३०) याच्या खून प्रकरणी त्याच्या चुलत भावाने मडगाव पोलीसात तक्रार दाखल केल्याने त्याच्या तक्रारीवरून पोलीसांनी सुरेश जालगर (वय ३१) विनोद जालगर (वय ३२) आसिफ नागरची (वय २९) मोहमंद शेख (वय ३१) आणि अक्षय भोवे (वय २४) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेत आणखी तिघांचा समावेश असल्याने पोलीस त्याचा कसोशीने शोध घेत आहेत.किरकोळ कारणातून वाढदिवशीच मुख्तार बदानी याचा सुरेश गॅंगमधील तरूणांनी खून केल्याने आझादनगर भागात हळहळ व्यक्त करण्यात येत होती. पोलीस कोठडी दरमान्य पोलीसांनी संशयीत आरोपीच्या कडून गुन्हात वापरलेला लोखंडी रॉड आणि इतर साहित्य जप्त केले होते. या घटनेचा तपास पोलीस उपाधीक्षक शिवेंद्र भूषण याच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक फिलॉमेन कोस्ता, पोलीस निरीक्षक मोहन गावडे,पोलीस निरीक्षक तुळसीदास नाईक यांनी केला. सुरेश गॅंगमधील तरूणांनी या पूर्वी ही आझादनगर भागात दशहत निर्माण करून असे प्रकार केले आहेत त्याना कोणत्या राजकीय गटाचा पाठींबा आहे का? अशी चर्चा या घटनेनंतर या भागातील नागरिकांत होत होती.

## आत्महत्या करणाऱ्या मुलाला ...

कक्षाकडुन मुलुंड मोबाईल १ वाहनावरील पथकास संदेश प्राप्त झाला की , मुलुंड (पश्चिम) डॉ.आर.पी.रोड वरील वर्धमान नगर येथील फ्लॅट क्र. २०२, सी विंग, मधल्या फ्लॅटमधुन रक्त येत आहे. त्यासाठी पोलीस मदतीची आवश्यकता आहे. ही माहीती मिळताच वाहनावरील पोउनि. बने व पथकाने तातडीने त्या ठिकाणी धाव घेतली. त्या ठिकाणी ६:३५ च्या सुमारास जाऊन फ्लॅटची पहाणी केली. तेव्हा फ्लॅटमधील हॉलमध्ये एक महीला रक्ताचे थारोळयात निपीचीत पडलेली दिसून आली. लागलीच या घटनेची खबर मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक कोथिंबीरे यांना देण्यात आली.ते आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस पथकाने घटनास्थळची पाहणी केली असता, एका ४६ वर्षीय महिलेचा कोणीतरी धारदार शस्त्राने गळा कापुन तिला जिवे ठार मारल्याचे दिसुन आले . हा प्रकार हत्येचा असल्याने या फ्लॅटच्या शेजारी रहाणारे रहीवाशांकडे पोलिसांनी विचारपुस केली . तसेच मृत महीलेचे पतीचा मोबाईल क्रमांक मिळवला व त्यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा त्यांनी त्यांचा मुलगा जयेश (वय २२) याचा रेल्वे अपघात झाला असुन तो राजवाडी रुग्णालयात आंतररूग्न म्हणुन उपचार घेत असल्याचे सांगीतले. पोलिसांना यात काहीतरी काळेबेरे असल्याचा संशय आल्याने त्यांनी मृत महिलेच्या घराची पहाणी केली . यावेळी घरातील हॉलमध्ये एक गुजराती भाषेतील चिठठी लिहलेली आढळून आली. तसेच बाथरूमच्या समोर एक चाकु पडला असल्याचे दिसुन आले. पोलिसांनी मृत महीलेचे पतीला घरी बोलावुन घेतले. त्यांना ती चिठठी दाखवली. तेव्हा चिठ्ठीतील हस्ताक्षर त्यांचा मुलाचा जयेश याचे असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच त्यांचा मुलगा व पत्नी वडीलोपोर्जित प्रॉपर्टीवरून डिप्रेशन मध्ये असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयाकडे रवाना केला. पोलिसांनी अधिक तपास केला असता वेगळीच माहिती पुढे आली. छाया महेश पांचाळ (वय ४६) असं मृत महिलेचे नाव असून, त्या पती महेश व मुलगा जयेश सह वरील ठिकाणी राहत होत्या. पांचाळ कुटुंबीय अत्यंत शांतता प्रिय असून गेल्या अनेक वर्षापासून ते या ठिकाणी राहत होते. अशा शांतता प्रिय कुटूंबाला कोणाची तरी दुष्ट लागली आणि या सुखी संसाराची राखरांगोळी झाली. मुलगा जयेश आणि त्याची आई छाया पांचाळ या दोघात वडिलोपार्जित मालमत्तेवरून वाद होता. हा वाद गेल्या काही वर्षापासून सुरू होता. त्यामुळे आई आणि मुलगा दोघेही नैराश्याने ग्रासलेले होते. एकाच घरात राहून दोघेही एकमेकांशी धड बोलत नव्हते. मुलगा सुशिक्षित होता. तो इंजिनिअर होता. पण आईच्या कटकटीमुळे तो कायम चिंतेत असायचा. या नैराश्यतून शनिवारी ९ जुलै रोजी सकाळच्या सुमारास जेयशने स्वयंपाक घरातील पंख्याखाला दुपट्टा बांधून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याची आई तिथे आली. तिने त्याला आत्महत्या करण्यापासून रोखले. त्यामुळे तो खवळला.यावरून त्या दोघां मायलेकात वाद झाला. या वादातून त्याच दिवशी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास जयेशने आईची धारदार शस्त्राने हत्या केली. आईची हत्या केल्यावर ती रक्ताच्या थारोळ्यात घरात निपचित पडली असताना तो बाथरूममध्ये गेला. आंघोळ केली आणि फ्रेश झाला. नंतर तो रेल्वे स्टेशन कडे गेला आणि तिकडे त्याने रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेत आई छाया महेश पांचाळ यांचा मृत्यू झाला असून मुलगा जयेश याच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहे. मुलाने आत्महत्येचा प्रयत्न केल्यानंतर वडील महेश पांचाळ हे त्याच्या सोबत आहेत. त्याची परिस्थिती गंभीर असून त्याच्यावर उपचार सुरू आहे. मुलगा जयेश आणि त्याची आई छाया पांचाळ या दोघात वडिलोपार्जित मालमत्तेवरून वाद होता. या वादातून त्याने आईची हत्या करून स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असे त्याचे वडील महेश पांचाळ यांनी पोलीस चौकशीत सांगितले. या प्रकरणी मुलंड पोलीस ठाणेस गु. नों.क्र.३७७/२०२२ कलम ३०२,२०१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, अधिक तपास पुर्व प्रादेशिक विभाग अपर पोलीस आयुक्त संजय दराडे, परिमंडळ ७चे पोलीस उप आयुक्त प्रशांत कदम व मुलुंड विभागाचे सहायक पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांतीलाल कोथंबीरे व पोलीस निरीक्षक दायमा हे करत आहेत.

## पैशाच्या वादातून त्याने पत्नीला ...

केली. कदाचित तो मरण पावला नसेल व त्याच्या अंगात धुगधुगी असेल अशी समजूत करुन तिने तो मृतदेह खाली उतरवला. त्यानंतर नातेवाईक आणि शेजाऱ्यांना ही बाब सांगून आपल्या नवऱ्याला दवाखान्यात न्यायला पाहिजे असे सांगून त्याला त्यांच्या मदतीने सिन्नर ग्रामीण रूग्णालयात नेले. डॉक्टरांनी सितारामला तपासले असता तो मृत झाल्याचे त्यांनी सांगितले. ही पोलीस केस होती. त्यामुळे याची फिर्याद पोलीस स्टेशनमध्ये द्यायला हवी असे तिच्यासमवेत असलेल्या काही जाणत्या लोकांनी वनिताला सांगितले. तोपर्यत रात्र उलटून गेली होती. दुसरा दिवस उजाडला होता. शुक्रवार दि. २० मे २०२२ रोजीची सकाळ. आठ-साडे आठ वाजले असावेत. एमआयडीसी सिन्नर पोलीस ठाण्यात अधिकारी कर्मचारी आपआपल्या कामात व्यस्त असतानाच एक महिला धावत पळत पोलीस ठाण्यात आली. पोलिसांनी तिला तिच्या येण्याचे कारण विचारत तिला ठाणे अंमलदारासमोर नेले. अजूनही वनिता स्थिरावली नव्हती. थोडा वेळ शांतपणे बसल्यानंतर तिने ठाणे अंमलदारांना आपले पूर्ण नाव सांगत आपल्या नवऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याचे सांगितले. पोलिसांनी तिच्याकडून सविस्तर माहिती घेवून अकस्मात मृत्यू रजि. नं. २६ / २०२२ नुसार या घटनेची नोंद केली. त्यानंतर दवाखान्यात जावून मृतदेहाची पहाणी केली आणि मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. यानंतर बीट अंमलदार जमादार गोरक्षनाथ बलक आपल्यासमवेत एक-दोन साथीदार घेवून घटनास्थळी गेले. पोलिसांनी गायकर कुटुंबाच्या घरातील परिस्थितीची पहाणी केली. पोलिसांना घरामध्ये काही संशयास्पद गोष्टी आढळून आल्या. तसे बीट अंमलदार जमादार गोरक्षनाथ बलक यांनी आपल्या वरीष्ठांना कळवले. पोलीस ठाण्यात वनिता गायकर हिने सांगितलेली माहिती आणि घटनास्थळावरील तफावत असल्याचे पोलिसांना समजून आले. तसेच सिताराम गायकर यांच्या मृतदेहाचा पंचनामा करताना गळ्याभोवती गोलाकार काळा व्रण दिसून आला. मृतदेहाच्या पोस्टमार्टममध्येही वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ही आत्महत्या नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त केला. तशी माहिती त्यांनी पोलिसांना दिली. यावरून पोलिसांना वनिता गायकर ही आपल्या नवऱ्याने आत्महत्या केल्याचा बनाव करत आहे हे लक्षात येण्यास वेळ लागला नाही. सत्य परिस्थिती काय आहे हे तिच्याकडूनच समजणार होते. सिताराम गायकर याचा खून तिने स्वतः केला की आणखी कोणी? हे जाणून घेण्यासाठी पोलिसांनी सावधगिरीने पावले टाकण्यास सुरुवात केली. संशयाचे टोक खरे तर वनिताकडेच वळत होते म्हणून पोलिसांनी सर्वप्रथम तिला विश्वासात घेतले. सुरुवातीला गोड बोलून तिला बोलते करण्याचा प्रयत्न केला. जसजसा प्रतिसाद मिळत गेला तसा पोलिसांनी आपला पवित्रा बदलत तिच्यावर प्रश्नांचा भडीमार सुरू केला असता आतापर्यत बनाव करण्यात यशस्वी झालेली वनिता डगमगली. काही प्रश्नांची उत्तरे देतांना ती बिचकू लागली. तोंडावरचे हावभाव बदलू लागली. पण पोलीस शांतपणे तिला प्रश्न विचारत होते. तिला त्याची उत्तरे काय हे समजत नसल्याने तिने कांगावा करण्यास सुरुवात केली. तशी पोलिसांनी कठोर भूमिका घेतली. अखेर वनिताला आपला गुन्हा कबुल करावाच लागला. गुरुवार दि. १९ मे २०२२ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता वनिताचा पती सिताराम कामावरुन घरी आला. त्यानंतर त्याची बहीण जन्याबाई गुंजाळ (रा. वाडीवऱ्हे) हिचा त्याला फोन आला. तिने सितारामकडे ६००० रूपये मागितले. तिने भिशी लागली होती. त्याचे पैसे भरणे निकडीचे होते. त्यामुळे तिने आपल्या भावाकडे सहा हजार रुपये मागितले. ते पैसे तिला ताबडतोब हवे होते. सितारामकडे इतकी रक्कम नव्हती. आपल्या बायकोकडे पैसे असतील, कारण तीही काम करते त्यामुळे कदाचित पैसे असतील या विचाराने सितारामने आपली पत्नी वनिताकडे सहा हजार रुपये मागितले. त्यावेळी वनिताने पैसे नाहीत असे सांगितले. तेव्हा सितारामने तिला आठवण करुन दिली की आपल्या पोस्ट खात्यात आरडी बचतीचे खाते आहे. त्यातून मला सहा हजार रुपये काढून दे. हे सांगत त्याने तिच्यामागे पैशाचे टुमणे लावले. पण वनिताने पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. आपली बायको पैसे असूनही बहीणीला मदत करण्यासाठी देत नाही म्हटल्यावर सिताराम चिडला आणि तो तिला शिवीगाळ करु लागला. यातून दोघा नवरा बायकोमध्ये वाद झाला. सितारामने वनिताला मारहाणही केली. यावेळी तो दारु पिलेला होता. त्यामुळे तो चिडला होता. त्याला पैसे न देणाऱ्या बायकोचा राग आला होता. आपला नवरा बहीणीला पैसे देण्यासाठी आपल्याला मारतो, शिवीगाळ करतो याचा वनितालाही राग आला होता. तीही रागातच होती. इकडे दारु पिल्याने नशा चढलेल्या सितारामने भांडणानंतर गप्प पडून राहणे पसंत केले. तो जमिनीवर पडला आणि थोड्या वेळातच झोपी गेला. आपला नवरा सिताराम हा आपणास मारहाण आणि शिवीगाळ करुन निवांत झोपलेला पाहून चिडलेल्या वनिताने घरात असलेला फेटा घेवून त्याचा पिळा केला आणि तो पिळा झोपलेल्या सितारामच्या गळ्यात टाकून त्याचा जोरात गळा आवळून खून केला. खून केल्यानंतर मात्र तिला आता पुढे काय होणार याची जाणीव झाली. पोलीस, तुरुंग, शिक्षा या गोष्टी लक्षात आल्यानंतर आपण हा खून केलाच नाही, आपल्या नव-याने आत्महत्याच केली आहे असे भासवण्याचे तिने ठरवले. रात्र झाली होती. त्यामुळे घरात बाहेरचे कोणी येणे शक्य नव्हते. त्यामुळे तिने आपल्या नवऱ्याने गळफास घेतल्याचे आणि आपणच तो मृतदेह खाली काढून ठेवला असे सांगायचे ठरवले. त्यानंतर तिने आपल्या नातेवाईकांना फोन करुन सांगितले की आपल्या नवऱ्याने पंख्याला फेटा बांधून आत्महत्या केली आहे. खरे तर झोपलेल्या सितारामचा गळा आवळला गेला होता. त्याचा मृतदेह पंख्याला लटकलेला नव्हता. तिला तो लटकवणेही शक्य नव्हते. पण तिने नातेवाईकांना सांगतांना मात्र पंख्याला लटकवून आत्महत्या केल्याचे सांगितले. पोलिसांनीही घटनास्थळाची पाहणी केली असता आत्महत्या केल्याचे कोणतेही दृष्य तिथे दिसून आले नाही. छताला लावलेला पंखाही चांगल्या स्थितीत होता. त्यामुळे हा बनाव लक्षात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही पोस्टमार्टम करतांना आत्महत्या नसल्याची शंका येत होती. मृत्यू गळा आवळल्याने झाला असला तरी हा गळा फास घेतल्याने आवळला होता की दुसऱ्या कुणी तो आवळला होता? हे लक्षात आले नव्हते. पण तरीही वैद्यकीय अधिकाऱ्यांना आत्महत्या नसून घातपाताची शंका आली. ती शंका त्यांनी पोलिसांना बोलून दाखवली आणि पोलिसांनी आपल्या हुषारीने संशयिताकडून गुन्हा कबुल करवून घेतला. वनिता सिताराम गायकर हिने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर जमादार गोरक्षनाथ दादा बलक यांनी सरकारतर्फे फिर्यादी होवून तिच्याविरोधात फिर्याद दिली. त्यानुसार एमआयडीसी सिन्नर पोलीस स्टेशनला गुन्हा रजि. नं. १३८/२०२२ नुसार वनिता सिताराम गायकर विरोधात भा.दं.वि. कलम १८१, ३०२ व २०१ अन्वये गुन्हा दाखल करुन तिला अटक केली. अवघ्या सहा हजारासाठी वनिता गायकर हिने आपल्या पतीचा गळा आवळून खून केला आणि त्याने आत्महत्या केल्याचा बनाव रचला. पण त्यात ती यशस्वी झाली नाही. या घटनेचा तपास पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, उपनिरीक्षक आर. के. त्रिभुवन, सहाय्यक उपनिरीक्षक गोरक्षनाथ बलक यांनी केला.

पान ८ वरून....

## वीजदर वाढ विरुद्ध 'आप'चे गांधी...

आघाडीवर रोष होता. आता नव्या सरकारला या मुद्द्यावरून आम आदमी घेरणार आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष प्रताप भोसले,लातूर कार्याध्यक्ष अमित पांडे, युवा आघाडी महाराष्ट्र सांस्कृतिक विभाग प्रदेशाध्यक्ष श्याम माने,सोशल मीडिया प्रमुख मराठवाडा हरी गोटेकर, लातूर मनपा प्रचारप्रमुख दीपक काणेकर, लातूर शहर सचिव सुमित दीक्षित, शहर उपाध्यक्ष सचिन औरंगे, भागवत कारंडे,मुस्तफा सय्यद, आनंदा कामगुंडा, लातूर मनपा झोन प्रमुख सतीश करंडे, बनसोडे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## तब्बल २५ ट्रॅव्हल्सद्वारे १२०७ भाविकांची...

या ताफ्यात होते. सहभागी सर्व भाविकांच्या चहापाणी, फराळ, मास्क आणि सॅनिटायझरची सोय मोफत करण्यात आली होती. अतिशय उत्साही वातावरणात, पांडुरंगाचा गजर करीत ही वारी पंढरपूरला सकाळी ०८ च्या दरम्यान रवाना झाली आणि रात्री ११.३० च्या सुमारास परत लातूरकडे प्रयाण केले. दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३०च्या दरम्यान सर्वच्या सर्व भाविक सुखरूपपणे लातूरला पोहोचले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जुगलकिशोर तोष्णीवाल, सोमनाथ मेदगे, जगदीश स्वामी, शफीक चौधरी, मदन केंद्रे, प्रविण पाटील, वाजीद शेख, नरेश घंटे, योगेश शिंदे, अभय मिरजकर, काशिनाथ बळवंते, डॉ. सितम सोनवणे, तम्मा पावले, प्रमोद गुडे, संजय स्वामी, ॲड. प्रदीप मोरे, गोपाळ झंवर, दिपरत्न निलंगेकर, ॲड.राहुल मातोळकर, गोविंद हेड्डा, गणेश हेड्डा, अभिजित पिचारे, मच्छिंद्र आमले, विनोद कांबळे, सचिन अंकुलगे, सचिन सोळुंके, प्रा. अजय वाघमारे, भास्कर कुंभार, विष्णू साबदे, सुनिल गवळी, श्रीराम जाधव, रत्नाकर निलंगेकर, राम साळुंके, एस. आर. काळे, उमेश कांबळे, अमर करकरे यांनी परिश्रम घेतले. उपक्रमात सहभागी सर्व भाविक भक्त ज्यांनी सर्व सूचनांचे पालन करून हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल आणि माझं लातूर परिवाराच्या स्वयंसेवक ज्यांनी खऱ्या अर्थाने सर्वाची आपुलकीने काळजी घेऊन कसलीही गैरसोय न होता ही वारी ऐतिहासिक केली याबद्दल माझं लातूर परिवाराचे प्रमुख सतीश तांदळे यांनी अभिनंदन केले आहे. यापुढील काळातही अनेक समाजपयोगी उपक्रम माझं लातूर परिवाराच्या वतीने राबविले जातील असे तांदळे यांनी सांगितले.

## मांजरा नदीकाठी वृक्षारोपना सोबतच...

दि.२१ जुलै २०२२ रोजी लातूर आणि बोकणगाव येथे वृक्ष दिंडी काढण्याविषयी सुद्धा चर्चा झाली. वृक्ष लागवडीसाठी आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध ग्रामस्थ उपलब्ध करून देतील असे ठरविण्यात आले. या बैठकीचे सूत्रसंचालन बाळकृष्ण काळे यांनी केले तर आभार ऑपरेटर गिरीधर शिंदे यांनी मानले. बैठकीला गावातील ग्रामस्थ आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या यशस्वितेसाठी राम जाधव, विजयकुमार शिंदे, कार्तिक स्वामी, जयचंद्र शिंदे ग्रामस्थानी सहकार्य केले.

## उल्हासनगरमध्ये शिवसेनेचा कार्यकर्ता ...

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सोबत आहोत असा नारा दिला गेलाये. उल्हासनगर मध्ये शहर शिवसेना शाखेच्या वतीने कार्यकर्ता निर्धार मेळावा आयोजित गेला होता. या निर्धार मेळाव्यामध्ये कल्याणचे संपर्कप्रमुख माजी आमदार सुभाष भोईर यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या निर्धार मेळाव्यामध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहोत असा विश्वास सर्व शिवसैनिकांनी या मेळाव्यात दिलाये. यावेळी शिवसेनेचे उल्हासनगर शहर प्रमुख राजेंद्र चौधरी, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते धनंजय बोडारे, उपशहरप्रमुख कैलास तेजी, जेष्ठ शिवसैनिक पत्रकार दिलीप मालवणकर, युवासेना अधिकारी बाळा श्रीखंडे उपस्थित होते.

## वृक्षलागवडीसह वृक्षसंगोपन करून...

विभागातील सहकारी अतिन त्यागी, अनिल जोशी, अजय काळे, मराठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे हेमंत बेलसरे, मुफ्ती हारून शेख, नगरसेवक रियाज बागवान, सुन्ना बी राजू पटेल, युसूफ हाजी, मतिन पटेल, संदीप पाटील, फहीम पटेल, अक्रम देशमुख, शाहीद सय्यद उपस्थित होते. दोघंही शाळेतील जवळपास १३०० विद्यार्थ्यांनी झाडे जगविण्याचा निर्धार केला. झाडे लावण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला. निंब, करंज, वड, गुलमोहर, रेन ट्री अशा विविध जातीची १२० च्यावर रोपांची लागवड शाळेत करण्यात आली. मुफ्ती हारून यांनी कुराणमधील दाखले देत वृक्षसंवर्धनाचे महत्त्व मुलांना समजून सांगितले. ज्याप्रमाणे मनुष्य त्याचप्रमाणे वृक्ष सांभाळले गेले पाहिजे असेही ते म्हणाले. ॲड. जमिल देशपांडे यांनी वृक्षसंवर्धनात विद्यार्थ्यांचा सहभाग किती मोलाचा आहे यावर भाष्य केले. अतिन त्यागी यांनी विद्यार्थ्यांशी विज्ञान आणि पर्यावरण याविषयावर सुसंवाद साधला. वातारणातील ऑक्सीजन, सूर्यप्रकाश, अन्नप्रक्रिया अतिन त्यागी यांनी समजून सांगितली. उर्दू शाळा क्र. ५६ चे मुख्याध्यापक शे. नईमोद्दीन अमीनोद्दीन, शाळा क्र. ३६ चे मुख्याध्यापक शे. कुरबान तडवी, उपमुख्याध्यापक शे.मो. अलीम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी नियोजनासह सहभाग घेतला. जैन इरिगेशनच्या नर्सरी विभागातील सहकारी मंगलसिंग राठोड, रविंद्र सपकाळे, शंकर गवळी यांच्यासह सहकाऱ्यांनी सहकार्य केले. शे. मो. अलीम यांनी सूत्रसंचालन केले. शे. नईमोद्दीन अमीनोद्दीन यांनी आभार मानले.

## देवणी तालुक्यातील सर्व ...

विचार करून न्यायदानाचे काम सोंडारे यांनी केले आहेत. त्यामुळे कुशल प्रशासक म्हणून नामांकित आहेत सोडारे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण होऊन आलेले पोलीस प्रशासनातील उच्च शिक्षित अधिकारी म्हणून कार्यरत आहेत पोलीस प्रशासनातील गाढा अभ्यास प्रचंड अनुभव यांचा नक्कीच पोलीस प्रशासनाला सर्वसामान्य लोकांना यांचा फायदा झाला आहे. त्यामुळे सोंडारे सामाजिक शैक्षणिक बांधिलकी आहे. प्रशासनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारे सेवा करून समाजहित जोपासण्याचे काम प्रशासकीय सेवेत असतांना घटनात्मक चौकटीत राहून करीत आहेत, त्यांची प्रशासकीय सेवा चालू आहे. त्यांचाच एक भाग म्हणून अतिवृष्टी पासून सतर्क राहण्याचा इशारा पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांनी दिला आहे.

## लातूर जिल्हा प्रशासनाच्या विरोधात ...

धारकाचे परवाने रद्द करावेत..निलंगा तहसीलदार यानी अवैद्य बाळू उपसाप्रकरणी लाच स्विकारुन प्रशासनाला गालबोट लावून अवैद्य वाळूउपसा करणाऱ्या वाळू तस्कराना साथ दिली ती चौकशी करुन संबंधीत तहसीलदार याना सेवामूक्त करुन, लातूर जिल्हाधिकारी यांची निष्क्रियता दिसून येते या बाबत चौकशी करुन लातूर जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांच्या कारभाराची चौकशी करुन यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करावी. लातूर शहर व जिल्ह्यात राजकीय पक्ष, सामाजीक संघटना, एक विचाराने सामाजीक सलोखा राखून कार्य करीत असताना, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक निवडणूक प्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी मा. विजयकुमार ढगे साहेब, निवासी उपजिल्हाधिकारी लातूर यानी जो कांही दुजाभाव करुन हस्तक्षेप केला तो न्यायीक नसावा, या संदर्भात चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करावी. २०२१ ला, तलाठी संघटनेने काम बंद आंदोलन पुकारले होते. या संदर्भात लातूर जिल्हाधिकारी याना दि. १३.१०.२०२१ रोजी निवेदन देण्यात आले होते, अद्यापही सदरील विषय गुलदस्त्यातच कसा, याचा खूलासा व्हावा. शासनाच्या अधिकृत कार्यालयात जावून माहीती घेणे किंवा संशयीत ठिकाणाचे व्हिडीओ सुटींगकरणेसाठी पत्रकाराना मज्जाव केला जातो. वरिष्ठ अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करतात, प्लेईंग कार्ड रुम स्थळी पहाणी व बातमी करण्यास पत्रकाराना मज्जाव केला जातो, काळाबाजार सुरळीतव्हावा हाच हेतू प्रशासनाचा असतो की काय असा प्रश्न निर्माण होतो. पत्रकाराना बातमीसाठी मज्जाव होवू नये यासाठी योग्य ते आदेश द्यावे. या मागण्या अंतर्भूत असून सदरील मागण्या मान्य होईपर्यत प्रसंगानुसार चौकशीअंती न्याय मिळेपर्यत आंदोलन चालूच राहील असे स्पष्टीकरण आंदोलन कर्ते पत्रकार रघुनाथ बनसोडे यानी केले.

## निलंगा शहरातील रस्त्यांसाठी ...

पाटील निलंगेकर यांनी मतदारसंघासह जिल्हयाच्या विकासाला पुन्हा एकदा चालना मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू केलेला आहे. या पाठपुराव्यामुळे निलंगा शहरातील रस्ते विकासासाठी राज्य सरकारच्या वतीने नगरपालिकेस ३ कोटी रूपयांचा निधी मंजूर केलेला आहे. त्याचबरोबर शिरूर अनंतपाळ शहरातील विविध विकास कामांसाठी नगरपंचायतीला २ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. निलंगा आणि शिरूर अनंतपाळ पालिका क्षेत्रात लवकरच या माध्यमातून विकास कामांना सुरूवात होणार आहे. सदर निधी मंजूर केल्याबददल माजीमंत्री आ.निलंगेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले आहेत. आगामी काळातही माजीमंत्री आ.निलंगेकर यांच्यामाध्यमातून निलंगा मतदारसंघासह जिल्हयात विकास कामांचा धडाका सुरू होवून एक नवीन विकास पर्व जिल्हयाच्या इतिहासात नोंदविले जाईल असा विश्वास व्यक्त होत आहे.

## महाविद्यालयात महिला दक्षता ...

परिचय देऊन यथोचीत स्वागत केले. महाविद्यालयामधील आय.क्यू.ए.सी, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग या सर्वाच्या वतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. सचिन बेद्रे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. मोनिका पवार यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली .

18 TO 24 JULY 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 16/07/2022 9:57 PM Page 1



# मांजरा नदीकाठ वृक्ष लागवड चळवळीत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त आणि सक्रिय सहभाग महत्वाचा-डी.ए.राऊत



**लातूर/प्रतिनिधी**

नदी पुर्नजीवन व नदीकाठाची पुरामुळे होणारी धूप व शेतात पाणी जाऊन पिकांचे नुकसान टाळण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर मांजरा नदी काठ दहा किलोमीटर पट्ट्यात वृक्ष लागवड अभियान राबविण्यात येत आहे यामध्ये ग्रामस्थांनी उस्फूर्त आणि सक्रिय सहभागी होणे आवश्यक आहे तेव्हाच हे अभियान यशस्वी होऊ शकते असे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी डी.ए.राऊत यांनी केले. रोहयो शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर व ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने मांजरा नदी काठ वृक्ष लागवड अभियानांतर्गत मौजे उमरगा येथे ग्रामपंचायत सभागृहात ग्रामस्थांची बैठक आयोजित करण्यात आली होती यामध्ये ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई, उपसभापती मनोज पाटील, कृषी सहाय्यक एस.पी.पुरी, ग्रामसेवक एस.डी.जाधव, मुख्याध्यापक आर.आय.पठाण आणि राजकुमार खाडप यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना राऊत डी.ए. म्हणाले की, मांजरा नदी काठी वृक्ष लागवड अभियान जिल्हाधिकारी बी.पी. पृथ्वीराज साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यामध्ये राबविले जात आहे. या अभियानात शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय, ग्रामस्थ, महिला व युवकांचा सक्रिय सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. वृक्ष लागवडीनंतर त्याचे योग्य व्यवस्थापन आणि देखरेख करणे सुद्धा गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यावेळी कॅप्टन डॉ.बी.एम.गोडबोले आणि डॉ.संजय गवई यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. या बैठकीमध्ये दि.२१ जुलै २०२२ रोजी जिल्हा आणि स्थानिक स्तरावर वृक्ष दिंडी काढण्याविषयी चर्चा झाली. तसेच वृक्ष लागवडीसाठी आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध ग्रामस्थांनी करून देण्यात यावी अशी ही चर्चा करण्यात आली.

# शारदा विद्यालयात आषाढी एकादशी उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी**

येथील शारदा विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी आषाढी एकादशीचे महत्त्व आणि पंढरपूर वारी याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण पुरी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचे वेश परिधान केले होते. गळ्यात तुळशीच्या माळा, विद्यार्थिनी वारकऱ्यांच्या डोक्यावर तुळशीची रोपे असल्याचे दिसून आले. यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग, गवळणी आदी गीते सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सुषमा मुंडे यांनी केले. आभार प्रदर्शन माधुरी पाटील यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी सहशिक्षक रेणुका समुद्रे, अनघा पाटील, मानसी पाटील, अश्विनी पवार, गीतांजली गिरी, शीतल नडगिरे, वर्षा कांबळे, प्रांजली जाधव, उषा गुडदे, अर्चना देशमुख, कांचन देवधर, ऐश्वर्या बागल, एकनाथ जाधव, जयपाल घोगरे उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# ठाण्यात शासकीय मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी**

ठाणे मधील कोठारी कंपाऊंड येथील मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून विद्यार्थीनींनी अर्ज करावे, असे आवाहन वसतीगृहाच्यावतीने करण्यात आले आहे. मागासवर्गीय मुलींचे हे वसतिगृह कोठारी कंपाऊंड, टिकुजिनिवाडी समोर, चितळसर, मानपाडा, घोडबंदररोड, ठाणे पश्चिम येथे आहे. या वसतिगृहात इयत्ता ८ पासून पुढील वर्गात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थिनींना सन २०२२-२३ करीता प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यानींनी कार्यालयीन वेळेत उपरोक्त पत्यावर संपर्क साधावा, असे मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहच्या गृहपालांनी कळविले आहे.

# गांधी रिसर्च फाऊंडेशनचा अभ्यासक्रम समाजाशी समरस करणारा -डॉ.अय्यंगार



**जळगाव/प्रतिनिधी**

गांधी रिसर्च फाऊंडेशनच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना समाजाशी समरस करणारा आहे. गांधीजींच्या अहिंसक समाजाची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी प्रथम समाजाशी समरस होण्याची आवश्यकता गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी प्रतिपादित केली. एक वर्ष चालणाऱ्या अभ्यासक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या संशोधन विभागाच्या डीन डॉ. गीता धर्मपाल, शिक्षणतज्ज्ञ अमोद कारखानीस, समन्वयक उदय महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. अश्विन झाला होते. आपल्या मनोगतात ते पुढे म्हणाले कि, मानवी जीवनात हृदय, डोकं व हात अर्थात भावना, विचार व काम या तीन गोष्टींवर यशस्विता अवलंबून असते. गांधी रिसर्च फाऊंडेशनचा अभ्यासक्रम समूह जीवनाद्वारे शिकण्याची प्रेरणा देते. व्याख्याने, क्षेत्र भेट, सर्वेक्षण, इंटर्नशिप याद्वारे विचार प्रक्रियेला चालना दिली जाते. विचार प्रक्रियाच समाजात अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांना यशस्वीतेसाठी शुभेच्छा देत असतांना गांधी विचारच जगात शांती प्रस्थापित करतील व ते गांधी विचार पोहोचविण्याची आपली जबाबदारी असल्याचे सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना महात्मा गांधीं संदर्भातील अनेक गैरसमज दूर होण्यासाठी, व्यक्तिमत्व विकासासाठी, ग्राम स्वराजची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी हा अभ्यासक्रम लाभदायक ठरल्याची भावना व्यक्त केली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांमध्ये रक्तापलीकडचे नाते तयार झाले. आपल्या घरापासून कधीही दूर न राहिलेल्या या विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळाल्याचेही ते म्हणाले. गत २० वर्षात केवळ परीक्षा पास होण्यासाठी शिकलो मात्र गांधी रिसर्च फाऊंडेशनने एक वर्षात केवळ जीवनाला दिशा न देता त्यासंदर्भातील तयारी आमच्याकडून करून घेतल्याचे सांगितले. शाश्वत शेती (सस्टेनेबल फार्मिंग), ग्रामोद्योग या विषयांवर अधिक भर देण्याची आवश्यकताही त्यांनी सांगितली. दुर्गा, चेतन, सौरभ, प्रतीक, देवेश, प्रशांत, अदिती, वैभव, प्रांजली, अमित, मयुरी, आरती, शरद, प्रफुल्ल, निलेश, बंटी या यवतमाळ, भंडारा, नाशिक, लातूर आदी जिल्ह्यांसह गुजरात मधून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच डॉ. गीता धर्मपाल, अमोद कारखानीस व डॉ. अश्विन झाला यांनीही मनोगत व्यक्त केले. गिरीश कुलकर्णी, सुधीर पाटील, निर्मला झाला आदी उपस्थित होते.

# कवी रमेश हनमंते यांच्या चक्रव्युह काव्यसंग्रहाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**



येथील कवी रमेश धोंडीबा हनमंते यांच्या चक्रव्युह या दुसऱ्या काव्यसंग्रहाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचा राज्यस्तरीय प्रथम (विभागून) पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्काराचे वितरण रविवार, दि.३१ जुलै २०२२ रोजी लातूर येथे होणार आहे. गेली चौदा वर्षापासून लातूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीच्या वतीने दरवर्षी विविध प्रकारातून उत्कृष्ठ साहित्यासाठीचे राज्यस्तरीय पुरस्कार दिले जातात. सन २०२१ च्या उत्कृष्ठ काव्यसंग्रह साहित्य प्रकारासाठी प्रथम (विभागून) कवी रमेश हनमंते यांच्या चक्रव्युह या काव्यसंग्रहाची निवड अकादमीने केल्याचे त्यांना कळविले आहे. रोख रक्कम १५०० रुपये, स्मृतीचिन्ह, शाल, सन्मानपत्र व पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कवी रमेश हनमंते यांचा चैतन्याचे झरे हा पहिला काव्यसंग्रह असून, त्याला ३ मे २०२२ रोजी राज्यस्तरीय प्रथम अण्णाभाऊ साठे साहित्य परिषदेचा पुरस्कार प्राप्त झाला असून, चक्रव्युह या नुकत्याच प्रकाशित दुसऱ्या काव्यसंग्रहाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर साहित्य अकादमीचा राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. कवी रमेश हनमंते यांच्या सामाजिक, परिवर्तनवादी साहित्याला कृतीला राज्यस्तरीय पुरस्कार लाभल्याबद्दल प्रा. रामकिशन समुखराव, प्रा.मारोती कसाब, ॲड.हाशम पटेल, कवी दिलीप गायकवाड, नरेंद्र गायकवाड, ॲड. माणिकराव पवार आदि मित्र परिवाराने हनमंते यांचे अभिनंदन केले आहे.

# श्रध्दा आणि अंधश्रध्दा यातील फरक म्हणजेच विज्ञाननिष्ठा होय!

लातूर : सामाजिक जीवनामध्ये जीवन जगत असताना श्रध्दा आणि अंधश्रध्दा या गोष्टी समोर येत असतात. शालेय शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांनी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यामध्ये याबाबत जनजागृती करावी. खऱ्या अर्थाने श्रध्दा आणि अंधश्रध्दा यातील फरक जाणून घेणे म्हणजेच विज्ञाननिष्ठा होय, असे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यीक तथा जगत्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष विवेक सौताडेकर यांनी केले. यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयात आयोजित समर्पित लोकसेवा सन्मान सप्ताहाच्या समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गोविंद शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प.आकाश देशमख महाराज खाडगावकर, ह.भ.प.सागर पुरी महाराज कव्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय**
**स्वातंत्र्याचा अनर जिल्हा मुख्यालय पालघर, पालघर - बोईसर रोड, कोळगाव, ता.नि, पालघर**
**(पुरवठा शाखा)**

दुरध्वनीक्रमांक-०२५२५-२९७०२४ ई-मेल : dsopalghar2014gmail.com

क्रमांक-पुरवठा/का./टे.शकावि- २११/२०२२ दिनांक : २९/०६/२०२२

**जाहीरनामा**
**प्रपत्र - अ**

| | |
|---|---|
| जाहीरनामा ज्या प्रकारच्या दुकान परवान्यासाटी आहे तो परवाना प्रकार. | **रास्तभाव धान्य दुकान** |
| अर्ज कोणत्या तहसीलदार यांचेकडे सादर करणेचा त्या तहसील कार्यालयाचे नांव व पत्ता तसेच जाहीरनाम्याशी संबंधीत तालुका | **तहसीलदार वसई** |
| अर्ज सादर करण्याची मुदत - | दिनांक - ०१/०७/२०२२ ते दिनांक -३१/०७/२०२२ पर्यंत |

अन्न, नागरी परवटा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : राभादु-१७१६/प्र.क्र.२३९/ नापु-३१, दि.०६ जुलै, २०१७ अन्वये रास्तभाव दुकाने व केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबत सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यातील तरतुदी विचारात घेऊन राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १२(१)(इ) मधील तरतुदीनुसार रास्तभाव दुकान मंजुर करण्यासाठी खालीलप्रमाणे प्राथम्यक्रम निश्चित करून देण्यात आला आहे.

१) पंचायत (ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था)
२) नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट
३) नोंदणीकृत सहकारी संस्था
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था
५) महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था

वरील प्राधान्यक्रमानुसार रास्तभाव दुकाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदायाद्वारे करणे आवश्यक राहील.

प्रस्तूत जाहीरनाम्याच्या अनुषंगाने संबंधीत गावातील / क्षेत्रातील गटांना अर्ज सादर करता येतील. प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी करण्यात येऊन पुढील निकषांच्या आधारे व वरील प्राथम्यक्रमानुसार संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेची निवड करण्यात येईल.

१) प्राथम्य सुचीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट सहकारी संस्थेची निवड करतांना जेष्ट, वर्धनक्षम व नियमीत कार्यरत असलेल्या, अंतर्गत व्यवहार पारदर्शक व परतफेड चोख व नियमीत असलेल्या, प्रतिवर्षी लेखापरिक्षण केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.
२) निवड करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्था / बचतगट / सहकारी संस्थेचे हिशेब व लेखे अद्यावत असावेत व परतफेडीचे प्रमाण किमान ८०% इतके असावे.
३) गटांची निवड करण्याचे काम सध्याचे रास्तभाव दुवाने व किरकोळ केरोसीन मंजुर करणारे परवाना_ प्राधिकारी अर्थात जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल.
४) समितीच्या निर्णयानुसार, ग्रामीण क्षेत्रात संबंधीत गटास रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र किंवा किरकोळ केरोसीन परवाना देण्यापूर्वी परवाना प्राधिकाऱ्यांमार्फत सदर प्रस्ताव संबंधीत गावाच्या महिला ग्रामसभेकडे विचारार्थ व शिफारशीसाठी पाठविण्यात येईल. महिला ग्रामसभेची शिफारस विचारात घेऊन दुकान मंजुरीबाबत अंतिम निर्णय परगना प्राधिकारी घेतील.

तहसीलदार वसई यांचेकडील पत्र क्रमांक/पुरवठा/कक्ष-१/टे-१/८वी-२६८/२२, दि. १०/०६/२०२२ अन्वये खालील प्रपत्र ब मध्ये नमुद केलेल्या रास्तभाव दुकानांचे (न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून) व्यवस्थापन नेमणूक करणेकामी जाहीरनामा काढणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पुढील प्रपत्र - ब मध्ये नमुद केलेल्या गावांतील / क्षेत्रांतील स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांना कळविण्यात येते की, वसई तालुक्यातील गावांपैकी । क्षेत्रांपैकी ज्या विशिष्ट गावात / क्षेत्रात रास्तभाव धान्य दुकान चालविण्याची इच्छा आहे. तसेच ज्या स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट । सहकारी संस्था ह्या त्याच विशिष्ट गावांच्या सिमेतील आहेत, अशाच इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांनी त्यांच्या गावांतील वरील परवान्यासाटी विहीत करण्यात आलेल्या नमन्यात एंबंधित तहसीलदार यांचे कार्यालयात, विहीत कालावधीत परिपूर्ण अर्ज सादर करावेत. कोन्या अर्जाचे नमुने रक्कम रु. ५/- (पाच) जमा केल्यानंतर तहसाल कार्यालयातील पुरवटा शाखेतून उपलब्ध होतील.

प्रस्तूत जाहीरनाम्यानुसार खालील गावांसाठी । क्षेत्रांसाठी रास्तभाव धान्य दुकान देण्याकरीता स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट । सहकारी संस्था यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधीत इच्छुक स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट । सहकारी संस्थांचे अध्यक्ष । सचिवांनी याबाबत नोंद घेऊन आपले अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह विहीत मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीत तालुक्यामध्ये आणखी पात्र गावांसाठी जाहीरनामे नव्याने काढण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, त्या जाहीरनाम्यास या जाहीरनाम्याची कोणतीही बाधा येणार नाही.

**वसई तालुक्यातील रिक्त व नव्याने मंजुर करावयाच्या रास्तभाव दुकानांची गावे खालीलप्रमाणे...**

प्रपत्र - ब तालुका - वसई

| अ.क्र. | गावाचे नाव | ऑनलाईन दुकान क्रमांक | अ.क्र. | गावाचे नाव | ऑनलाईन दुकान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | देवतलाव (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६२३ | २. | ससुनवघर (फेर जाहीरनामा) | १६४६२३८०००२६ |
| ३. | किरवली (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६३७ | ४. | भालीवली (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६८१ |
| ५. | मेढे (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६८९ | ६. | तरखड (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००७४० |
| ७. | पाली (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००७४८ | ८. | कळंभोन (फेर जाहीरनामा) | १६४६२३८००६९२ |
| ९. | चिखलडोंगरे (फेर जाहीरनामा) | - | - | - | - |

**अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक आहे.**

१. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांकडील प्रमाणपत्र
२. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांची नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व आधार क्रमांकासह यादी, तसेच सर्व सभासदांच्या आधारकार्डाच्या छायांकीत प्रती
३. स्थानिक स्वराज्य संस्था स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांचे एकत्रित रंगीत छायाचित्र (ग्रुप फोटो)
४. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांचे मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षणाचे अहवाल
५. बँकेच्या पासबुकाची पहिल्या पानापासून सर्व पानांची छायांकीत प्रत
६. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांनी बँकेकडून व्यवसायासाठी कर्ज घेतले असल्यास, त्याची परतफेड व इतर तपशिल दर्शविणारे बँकेचे विवरण (Bank statement)
७. सभासदांना अंतर्गत कर्ज वाटप केलेले असल्यास, त्याचा तपशिल आणि वसुलीबाबतचे विवरणपत्र
८. स्थानिक स्वराज्य संस्था स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था हे ज्या ठिकाणी परवान्यानुसार दुकान चालविणार आहेत, त्या जागेच्या मालकी हक्काचा पुरावा. यात ग्रामपंचायतीकडील नमुना आठ सातबारा उतारा / नगर भूमापन विभागाकडील मिळकतीचा उतारा इ. तसेच प्रस्तावित जागा भाड्याची असल्यास ग्रामपंचायतीचा नमुना आठ सिटी सर्व्हेचा उतारा इ. व रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवरील जागा मालकाचे संमतीपत्र व भाडे करारनामा
९. स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांच्या इतर वैशिष्ट्यपूर्ण कामाबाबत / उपक्रमाबाबतचा पुरावा (राष्ट्रीय / राज्यस्तरीय, प्रादेशिक स्तरावरील प्रदर्शनामध्ये सहभाग व इतर शासकीय योजनेमध्ये सहभाग)
१०. ज्या संस्थेने/कार्यालयाने स्वयंसहाय्यता गट स्थापन केला असेल, अशा संस्थेची/कार्यालयाची शिफारस (फक्त स्वयंसहाय्यता बचत गटासाटी लागू)
११. स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वयंसहायता बचतगट्। सहकारी संस्था यांचेकडील रास्त भाव धान्य दुकान चालविण्यासाठी मंजूर केलेला मासिक सभेचा ठराव/मासिक सभेचे इतिवृत्त (जाहिरनामा प्रसिध्द केलेल्या तारखेपासून ते अर्ज करावयाच्या तारखेच्या आधीच्या दिनांकाचा ठराव /इतिवृत्त)
१२. अर्जदार स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वयंसहाय्यता बचत गट/सहकारी संस्था यांचे नावाने आधीचे रास्तभाव दुकान मंजुर नसल्याबाबतचे अध्यक्षांच्या सहीचे प्रतिज्ञापत्र

विहीत नमुन्यातील परिपूर्ण माहिती भरलेला अर्ज, त्यावर विहित ठिकाणी स्वाक्षरी, आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडून, विहीत मुदतीत संबंधीत तहसील कार्यालयात सादर करावा. एकापेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट / सहकारी संस्था यांचे अर्ज प्राप्त झाल्यास, वरील निकषांचा प्रामुख्याने विचार करुन रास्तभाव दुकान मंजूरीसाठी पात्र स्थानिक स्वराज्य संस्था / स्वयंसहाय्यता बचतगट सहकारी संस्था यांची शासन निर्णयातील तरतदींनुसार निवड करण्यात येईल. विहित मदतीनंतर आलेल्या तसेच अपूर्ण माहिती व अपुऱ्या कागदपत्रांसह आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरचा जाहीरनामा शासन निर्णय क्रमांक : राभादु १७१६/प्र.क्र.२३९/नाप-३१, दिनांक ०६ जलै, २०१७ मध्ये दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर जाहीरनाम्यानुसार रास्तभाव दुकान मंजुरीची कार्यवाही संपूर्णत: /कोणत्याही दुकानाच्या संदर्भात व कोणत्याही टप्प्यावर स्थगिती / बंद करण्याचे अधिकार परवाना प्राधिकारी यांना राहतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(बाळासाहेब कोळेकर)**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**पालघर**

# लातूर जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ३४८.५ मिमी पावसाची नोंद

लातूर : जिल्ह्यात आज सकाळी ८.०० वाजेपर्यंत मागील २४ तासांत २.६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तर जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ३४८.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे. जिल्ह्यात आज दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी सकाळी ८.०० वाजेपर्यंत मागील २४ तासांत झालेला पाऊस मिलीमीटर मध्ये तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. यात कंसांत दिलेले आकडे हे आतापर्यंत पडलेल्या एकूण पावसाचे आहेत.लातूर -५.५ (३४५.९) मि.मी., औसा- ०.९ (२३९.२) मि.मी., अहमदपूर- ४.४ (४६७.५) मि.मी., निलंगा - ०.३ (२४४.८) मि.मी, उदगीर- ०.३ (४२८.५) मि.मी, चाकूर-८.० (४१०.१), रेणापूर-१.६ (३३३.९), देवणी - ०.४ (३३०.३), शिरुर अनंतपाळ -२.८ (३९१.८ ), जळकोट-१.८ (४५६.५), पाऊस झाला आहे. याप्रमाणे जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ३४८. मि.मी. पावसाची नोंद झाली असल्याचे जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

18 TO 24 JULY 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 16/07/2022 9:58 PM Page 1



# वीजदर वाढ विरुद्ध 'आप'चे गांधी चौक येथे आंदोलन, तहसीलदारांना निवेदन




**लातूर/प्रतिनिधी**

महावितरण व इतर खाजगी वीज कम्पन्यांनी जाहीर केलेल्या वीज दरवाढी विरुद्ध आम आदमी पार्टी लातूरसह राज्यभर आक्रमकपणे रस्त्यावर उतरली. या महिन्यापासून आता घरगुती वीज ग्राहकाला साधारणतः २० टक्के दरवाढीचा फटका बसणार आहे.१०० ते ३०० युनिट पर्यत एका युनिट मागे १रुपये ४५ पैसे अशी समायोजन आकारात वाढ होणार आहे. त्यामुळे ज्यांना १००० रु बिल येत होते त्यांना १२०० रु बिल येईल. लॉकडाऊन काळातील थकीत वीज बिले, पेट्रोल, गॅस सिलिंडर दरवाढ यामुळे आधीच महागाईने त्रस्त झालेल्या सामान्य जनतेस हा मोठ्ठा शॉक आहे. म्हणून ही दरवाढ तातडीने मागे घ्या अश्या मागणीची निवेदन मुख्यमंत्र्यांच्या नावे स्थानिक तहसीलदार यांना आप तर्फे निवेदन देण्यात आले. महावितरण कडून लॉकडाऊन काळात दि.१ एप्रिल २०२० पासून २०% वीज दर वाढ करण्यात होती. त्यामुळे संपूर्ण देशात महागडी वीज राज्यात आहे. तरीही आता नवे सरकार आल्याबरोबर जवळजवळ २०% पर्यत या महिन्यापासून दर वाढ केली आहे. शिवसेनेकडून विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील जनतेला वचन दिले होते की आमचे सरकार आल्यास आम्ही ३०० युनिटपर्यतची घरगुती वापरासाठीची वीज ३०% स्वस्त देवू. तसेच बीजेपी कडून विविध राज्यातील निवडणूक जाहीरनाम्यात १०० ते २०० युनिट वीज मोफत देण्याचे जाहीर केले आहे. एवढेच नव्हेतर महाविकासआघाडी सरकार असताना मागच्या दोन वर्षात भाजप व स्वतः देवेंद्र फडणवीस यांनी वीज दरवाढ कमी करने व मोफत वीज देण्याबाबत अनेक वेळा रस्त्यावर येवून आंदोलन केली आहेत. आता वचन देणारे शिवसेना नेते आणि वीज दर कमी करण्याची मागणी करणारे भाजप सत्तेवर आल्याने, आता जनतेला दिलासा देण्याची संधी त्यांना आहे, दरवाढ मागे घ्याच शिवाय आता ही ३० टक्के सवलत देत खरे शिवसैनिक असल्याचे दाखवून द्या असे आव्हान आम आदमी पार्टी लातूरने मुख्यमंत्र्यांना केले आहे. दिल्लीमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सरकार मागच्या आठ वर्षापासून २०० युनिट वीज मोफत आणि जास्त वापर करणाऱ्यांनाही कमीत कमी दरात वीजपुरवठा करीत आहे, तरीही दिल्ली सरकारचे वीज खाते नफ्यात आहे. तसेच पंजाब मध्ये नव्याने आलेल्या आपच्या भगवंत मान सरकारने सुद्धा दि. १ जुलै पासून ३०० युनिट मोफत वीज केली आहे. आपल्या राज्यात २.५० ते ३.०० रुपयात प्रती युनिट तयार होणारी वीज १२ ते १८ रुपये प्रति युनिट प्रमाणे दर लावून जनतेची लुट होत आहे. ही सावकारी लुट थांबविण्यासाठी आम आदमी पार्टी हा मुद्दा घेवून राज्यात गेल्या दोन वर्षापासून सातत्याने आंदोलन करीत आहे. आजच्या निवेदनातून राज्यात दि १ जुलै २०२२ पासून विजेच्या दरात जी १० ते २०% अधिभार लावून वाढ केली ती त्वरित मागे घ्यावी. वीज कंपन्यांचे कॅग/ऑडीट करण्यात यावे, राज्यातील जनतेला दिल्ली व पंजाब सरकार प्रमाणे कमीत कमी २०० युनिट वीज मोफत द्यावी अश्या मागण्या आज आम आदमी पार्टीने केल्या आहेत. जनतेच्या मनातही वीज बिल बाबत महाविकास ...पान ६ वर

# वृक्षलागवडीसह वृक्षसंगोपन करून हरित जळगावचे ध्येय गाठू –विद्या गायकवाड

## मास्टर कॉलनीतील मनपा उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण



**जळगाव/प्रतिनिधी**

निसर्गावरील मानवी अतिक्रमणामुळे निसर्गचक्र बिघडले आहे. त्यामुळेच कधी अतिवृष्टी, कधी कोरडा दुष्काळ, कोरोनासारख्या महामारी अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे निसर्गाची जपणूक करणे आणि हरित सुंदर करणे यासह वृक्षसंवर्धनाचा वारसा पुढील पिढीला संस्कारित करणे. यासाठी वृक्ष लावणेच नाहीतर त्यांचे संगोपण करणे ही काळाची गरज आहे. असे सांगत हरित जळगावचे ध्येय झाडे जगवूनच गाठता येईल, यासाठी गांधी रिसर्च फाऊंडेशन व मराठी प्रतिष्ठानतर्फे सुरू असलेल्या वृक्षसंवर्धनाच्या चळवळीत जळगावकरांनी सहभागी होण्याचे आवाहन मनपा आयुक्त विद्या गायकवाड यांनी केले. मेहरूणमधील मास्टर कॉलनी परिसरातील मेमन हाजी इब्राहीम रानानी मनपा उर्दू प्राथमिक शाळा क्र. ३६ व ५६ आणि मनपा उर्दू माध्यमिक शाळा क्र.१ येथील वृक्षारोपणाप्रसंगी आयुक्त विद्या गायकवाड बोलत होत्या. याप्रसंगी उद्योजक सुबोध चौधरी, जैन इरिगेशनच्या पर्यावरण ...पान ६ वर

### माझं लातूर परिवाराचं अनोखा लातूर पॅटर्न

# तब्बल २५ ट्रॅव्हल्सद्वारे १२०७ भाविकांची मोफत पंढरपूर वारी




**लातूर/करकरे अंबादास**

माझं लातूर परिवार आणि ट्रॅव्हल्स व्यावसायिक यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त मोफत पंढरपूर वारीचा उपक्रम राबविण्यात आला. ११४७ भाविक प्रवाशी, ६० स्वयंसेवक, ०२ रुग्णवाहिका आणि विक्रमी २५ ट्रॅव्हल्सने एकूण १२०७ भाविक भक्तांची मोफत पंढरपूर वारी घडवून राज्यात एक नवीन लातूर पॅटर्न निर्माण केला. या ऐतिहासिक वारी उपक्रमास लातूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक निखील पिंगळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. लक्ष्मण देशमुख, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांच्यासह माझं लातूर परिवाराचे डॉ. सदानंद कांबळे, आदित्य भुतडा, शाम तोष्णीवाल, उपक्रमास बिनशर्त सहकार्य करणारे सर्व ट्रॅव्हल्स व्यावसायिक यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी सांगितले की पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत जात असताना संयोजकांनी आणि पोलीस प्रशासनाने दिलेल्या सर्व सूचना भाविकांनी पाळाव्यात ज्यामुळे कोणालाही त्रास होणार नाही. अधिक गर्दीत जाण्याचे टाळावे. डॉक्टर लक्ष्मण देशमुख व प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये यांनी मनोगत व्यक्त करून सहभागी सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या व या ऐतिहासिक उपक्रमाबद्दल माझं लातूर परिवाराचे कौतुक केले. माझं लातूर परिवार आणि ट्रॅव्हल्स व्यावसायिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात ११४७ भाविकांना पंढरपूरला दर्शनासाठी पाठवण्यात आले. या सर्व भाविक प्रवाशांच्या सेवेसाठी ६० स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. यासोबतच ०२ रुग्णवाहिका, ०२ डॉक्टर, ०४ नर्सिंग स्टाफ अत्यावश्यक औषधांसह ...पान ६ वर

# मांजरा नदीकाठी वृक्षारोपणासोबतच वृक्ष संवर्धन आणि देखरेख महत्वाची–नायब तहसिलदार भीमाशंकर बेरूळे

## बोकणगाव येथे मांजरा नदीकाठी वृक्ष लागवड चळवळ ग्रामस्थ बैठक



**लातूर/प्रतिनिधी**

नदी पुर्नजीवन व नदीकाठच्या जमिनीची होणारी धूप व शेतात पाणी जाऊन होणारे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर मांजरा नदी काठी दहा किलोमीटर पट्ट्यात दि.२४ जुलै रोजी एकाच वेळी समूहिकपणे ३०,००० वृक्ष लागवड करण्यात येणार आहे तेव्हा त्याचे संवर्धन आणि देखरेख करणे सुध्दा महत्वाचे असल्याचे प्रतिपादन नायब तहशिलदार भीमाशंकर बेरूळे यांनी बोलताना व्यक्त केले. रोजगार हमी योजना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर व ग्रामपंचायत कार्यालय, बोकणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मांजरा नदी काठ वृक्ष लागवड अभियानांतर्गत मौजे बोकणगाव येथे ग्रामपंचायत सभागृहात अधिकारी व ग्रामस्थांची बैठक आयोजित करण्यात आली होती यामध्ये ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई, मंडळ अधिकारी संजय घाडगे, प्रगतशील शेतकरी माधव दाताळ, तंटा मुक्ती अध्यक्ष तानाजी दाताळ, ग्रामसेवक जे.ए.तोडकर, मुख्याध्यापक आर.के.जाधव, तलाठी माधव जवळगे, उपसरपंच किशोर दाताळ, चेअरमन अजय शिंदे, समर्थ दाताळ आणि दीपक पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, कॅप्टन डॉ.बी.एम.गोडबोले आणि डॉ.संजय गवई यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. या बैठकीमध्ये ...पान ६ वर

# उल्हासनगरमध्ये शिवसेनेचा कार्यकर्ता निर्धार मेळावा

## आम्ही सर्व निष्ठावंत शिवसैनिक पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सोबत



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगरमध्ये निष्ठावंत शिवसैनिकांकडून कार्यकर्ता निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या निर्धार मेळाव्यामध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहोत. असा विश्वास या कार्यकर्ता निर्धार मेळाव्यात उल्हासनगर मधील निष्ठावंत शिवसैनिकांनी केलाये.या निर्धार मेळाव्यात असंख्य निष्ठावंत शिवसैनिक उपस्थित होते. शिवसेनेतील मोठा गट एकनाथ शिंदे यांच्यांसोबत गेल्याने उद्धव ठाकरे सरकार कोसळले आहे. बंडखोरीमुळे शिवसेनेत मोठी फूट पडली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसाठी हा मोठा धक्का असून पक्ष संघटना उभी करण्यासाठी ते पुन्हा मैदानात उतरले आहे. बुधवारी उल्हासनगर मधील १५ माजी नगरसेवकांनी ठाण्यामध्ये बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांच्या गटात सहभागी होऊन मोठं शक्ती प्रदर्शन केलं. तर दुसरीकडे आम्ही शिवसेना ...पान ६ वर

# देवणी तालुक्यातील सर्व लोकांनी सतर्क राहावे –पोनि गणेश सोंडारे

**देवणी/प्रतिनिधी**



तालुक्यासह संपूर्ण राज्यात गेली तीन चार दिवसांपासून सततधार पाऊस चालू आहे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. नदी नाल्याना पूर आला असून मनुष्य व प्राण हानी होण्याची शक्यता आहे. नदी नाल्याकाठी राहणाऱ्या लोकांनी आपली जनावरे व आपण सुरक्षित ठिकाणी राहून आपले संरक्षण करून घेण्यासाठी सतर्क राहण्याचा इशारा देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांनी देवणी तालुक्यातील पोलीस पाटील यांच्या मार्फत लोकांना दिला आहे. देवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ख्याती आहे त्यांनी देवणीत रुजू झाल्यापासून कायदा व सुव्यवस्था तालुक्यात निर्माण करण्याचे काम केले आहे कायदा सुव्यवस्था बिघडण्याअगोदर त्याचा नियोजन बद्द बंदोबस्त कसा करावा यांचे कसब सोंडारे यांच्याकडे आहे. आज पर्यंतच्या कार्यकीर्दीत न्याय निवाडा करीत असताना कोणत्याच प्रकरणाकडे एका बाजूने बघितले नाही कोणावर अन्याय होईल अशी घटनात्मक कारवाई केली नाही त्यांनी समतोल दृष्टीकोनातून ...पान ६ वर

# लातूर जिल्हा प्रशासनाच्या विरोधात पत्रकार रघुनाथ बनसोडे यांचे केश मुंडन आंदोलन संपन्न





**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहर हे कायदा व सुव्यवस्था, सामाजीक राजकीय बांधीलकेचे शहर असल्याने लातूरचे जिल्हाधिकारी आणि निवासी उप जिल्हाधिकारी यांच्या ढिसाळ, निष्क्रीय, अकार्यक्षम कारभारामुळे लातूर शहराच्या लोकाभिमूख वैभवाला काळीमा फासला जात असल्याने जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. आणी निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांच्या सर्वकष कारभाराची चौकशी करावी यासाठी, पत्रकार रघुनाथ बनसोडे यानी जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालया समोर केस मुंडण आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधले आणी पोलीस निरिक्षक एमआयडीसी यानी निवेदन स्विकारुन ते विभागीय आयूक्त औरगांबाद यांचेसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे वर्ग करण्याची हमी दिली. केस मुंडण आंदोलनाच्या निमित्ताने पत्रकार रघुनाथ बनसोडे यानी विभागीय आयूक्त औरंगाबाद याना पोलीस निरिक्षक एमआयडीसी पोलीस ठाणे लूर यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात प्रामूख्याने, लातूर शहर व जिल्ह्यातील प्लेईंग कार्ड रुमच्या नावाखाली जूगार खेळविला जातो चौकशी अंती दोषी, प्लेईंग कार्ड रुम परवाना ...पान ६ वर

# निलंगा शहरातील रस्त्यांसाठी ३ कोटी तर शिरूर अनंतपाळ नगरपंचायतसाठी २ कोटी निधीची मंजुरी

## मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे आ.निलंगेकरांनी मानले आभार

**लातूर/प्रतिनिधी**



निलंगा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर हे सातत्याने मतदारसंघाच्या विकासासाठी विविध माध्यमातून केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करीत असतात. या पाठपुराव्यातूनच निलंगा शहरातील रस्ते विकासासाठी निलंगा नगरपालिकेस ३ कोटी रूपये तर शिरूर अनंतपाळ नगरपंचायतच्या माध्यमातून शहरातील विविध विकास कामासाठी २ कोटी रूपेयांच्या निधीस मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर निधीस मंजुरी दिल्याबद्दल माजीमंत्री आ.निलंगेकरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले आहेत. सदर निधी मंजुर झाल्याने माजीमंत्री आ.निलंगेकर यांच्या नेतृत्वात विकास पर्वास प्रारंभ झाले असल्याचे सर्व सामान्यांकडुन बोलले जात आहे. गत अडीच वर्षापूर्वी सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने फक्त बांद्रा आणि बारामतीच्या विकासाला प्राधान्य दिले असल्याचे पाहण्यास मिळाले होते. विशेषत: मराठवाडयाच्या विकासाकडे या सरकारने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याची भावना जनतेकडुन सातत्याने व्यक्त होत होती. अखेर या तीन पक्षातील कलहामुळे या सरकारला पायउतार व्हावे लागले. आणि राज्यात पुन्हा एकदा सर्वसामान्यांच्या हिताचे आणि चौफेर विकासाचे सरकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात स्थापन झाले. नवीन सरकार स्थापन होताच माजीमंत्री आ.संभाजी ...पान ६ वर

# महाविद्यालयात महिला दक्षता दलाची स्थापना



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा येथील डॉ . शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला दक्षता गटाची स्थापना वाडा येथील शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाडा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दशरथ पाटील व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेंद्र खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनानुसार महिला दक्षता गटाची व महिला तक्रार पेटी यांची स्थापना करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना पोलिस निरीक्षक दशरथ पाटील यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारा बाबत असणाऱ्या प्रतिबंध कायद्यांची ओळख करून देऊन पुरुषांकडून किंवा मुलांकडून होणाऱ्या अत्याचाराचा निर्भयपणे प्रतिकार केला पाहिजे व कोणत्याही महिला व मुलींवर जर कोणी अत्याचार करत असेल तर कोणत्याही प्रकारची भिती मनात न बाळगता त्याबाबतची रीतसर तक्रार स्वतः किंवा महिला दक्षता गटाच्या वतीने पोलिस ठाण्यात नोंदविली पाहिजे असे सांगून पोलिस तुमच्या मदतीसाठी सदैव तत्पर असतील असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या आरंभी प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेंद्र खांडेकर यांनी दशरथ पाटील व पोलिस गजानन जाधव, चेतन सोनावणे यांचा ...पान ६ वर

# चलबुर्गा येथे नाबार्ड बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त शेतकरी मेळावा



**औसा/प्रतिनिधी**

राष्ट्रीय बँक म्हणजेच नाबार्ड बँकेच्या वतीने आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने चलबुर्गा तालुका औसा येथे नाबार्ड बँकेच्या ४०व्या वर्धापन दिनानिमित्त शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यामध्ये लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या लामजना शाखेच्या वतीने बँक ग्राहकांना एटीएम कार्ड मोबाईल बँकिंग सेवा डिजिटल सेवा प्रधानमंत्री पिक विमा योजना महिलांच्या आर्थिक विकास साठी देण्यात येणाऱ्या विविध योजना शेतकऱ्यांना पाच लाखापर्यंतचे बिनव्याजी कर्ज तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या कर्जधारकांना व्याज परतावा अशा विविध विषयाची सविस्तर माहिती देण्यात आली. या मेळाव्यात विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन प्रभाकर मोरे तसेच संचालक मंडळ, सभासद, ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला ग्रामपंचायत कार्यालय येथे या मेळाव्यात फिल्ड ऑफिसर जाधव साहेब, शाखा व्यवस्थापक महेश सोमवंशी, सेक्रेटरी दत्ता गोरे, सेक्रेटरी माळी यांनी मार्गदर्शन केले.